रविवार, १५ मे २०२२

# राम प्रहर


◆ वर्ष १४ ◆ अंक २९७
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

पाली प्राथमिक आरोग्य केंद्राचा गलथान कारभार/२
अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर अर्थ प्रहर/४
पेण येथे थांग-ता मार्शल आर्ट प्रशिक्षण शिबिर/८

## आक्षेपार्ह पोस्टप्रकरणी अभिनेत्री केतकी चितळे पोलिसांच्या ताब्यात



**नवी मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्याविरोधात आक्षेपार्ह पोस्ट शेअर केल्याप्रकरणी छोट्या पडद्यावरील अभिनेत्री केतकी चितळे हिला नवी मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. केतकीला शनिवारी (दि. १४) सायंकाळी कळंबोली येथून ताब्यात घेण्यात आले. तिचा शोध ठाणे गुन्हे शाखा घेत होती. केतकी सध्या कळंबोली येथील तिच्या मावशीच्या घरी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार तेथून तिला ताब्यात घेण्यात आले. नवी मुंबई पोलिसांकडून ताबा मिळाल्यानंतर केतकीला ठाणे गुन्हे शाखेच्या कार्यालयात आणले जाणार आहे. त्यानंतर पुढील कायदेशीर प्रक्रिया पार पाडली जाईल. दरम्यान, केतकीविरुद्ध कळवा आणि पुणे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. तिने खासदार शरद पवार यांच्याबद्दल आक्षेपार्ह भाषेत लिहिलेली पोस्ट फेसबूक अकाउंटवरून शेअर केली आहे.

# सलग सुट्यांमुळे महामार्ग जाम

## वाहनांच्या लांबच लांब रांगा; वाहतूक कोंडीचा प्रवाशांना फटका





**पाली, खोपोली : प्रतिनिधी**

सलग जोडून आलेल्या सुट्यांमुळे पर्यटक, नागरिक मोठ्या संख्येने बाहेर पडल्याने शनिवारी (दि. १४) जिल्ह्यातील महामार्गांवर वाहतूक कोंडी झाली होती. याचा फटका प्रवासी आणि वाहनचालकांना बसला.

उन्हाळ्याच्या दिवसांत पर्यटनस्थळे विशेषतः समुद्रकिनारे व जलाशयाची ठिकाणे बहरली आहेत. तेथे धम्माल करण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात बाहेर पडू लागलेत. अशातच शनिवार, रविवारनंतर सोमवारी बुद्धपौर्णिमेची सुटी जोडून आल्याने मुंबई, पुणे व इतर शहर, उपनगरांतून सुटी एन्जॉय करण्यासाठी आलेल्या पर्यटक, चाकरमान्यांना शनिवारी वाहतूक कोंडीचा मोठा फटका बसला.

मुंबई-गोवा महामार्गावर रायगड जिल्ह्यातील माणगाव, इंदापूरजवळ शनिवारी सकाळपासून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. कोकण तसेच गोव्याकडे जाणाऱ्या वाहनांची मोठी गर्दी दिसून आली. कडक ऊन आणि त्यात वाहतूक कोंडीमुळे प्रवासी त्रस्त झाले होते, तर कोंडी सोडविताना पोलीस यंत्रणेची दमछाक झाली.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरदेखील वाहतूक कोंडी होऊन वाहनांचा वेग मंदावला. खालापूर टोलनाका आणि बोरघाटात दोन्ही मार्गिकांवर वाहनांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे एक्स्प्रेस वेने प्रवास करणाऱ्यांना त्रास सहन करावा लागला.

सध्या कोकणवासीय चाकरमान्यांची गावी जाण्याची लगबग सुरू आहे. त्याचबरोबर पर्यटकदेखील कोकणातील पर्यटनस्थळे पाहण्यासाठी मोठ्या संख्येने निघाले आहेत. त्यामुळे वाहनांची संख्या वाढून मोक्याच्या ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे.

## मुलीला वाचविताना पाच जणींचा बुडून मृत्यू

**लातूरमधील घटना**




**लातूर : प्रतिनिधी**

कपडे धुण्यासाठी तलावावर गेलेल्या तीन महिला व दोन तरुणी अशा पाच जणींचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शनिवारी (दि. १४) लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यात किनगाव येथे घडली. मृत महिला या परभणी जिल्ह्यातील पालम तालुक्यातील रहिवासी आहेत. या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे.

ऊस तोडणीच्या कामासाठी परभणी जिल्ह्यातील मजूर पाच महिन्यांपासून अहमदपूर तालुक्यात आहे. ऊसतोड महिला शनिवारी सकाळी तुळशीराम तांडा येथील तलावावर कपडे धुण्यासाठी गेल्या होत्या. कपडे धुवत असताना अचानकपणे एक मुलगी बुडत असल्याचे दिसू लागल्याने एकापाठोपाठ एक अशा चौघींनी तिला वाचविण्याचा प्रयत्न केला, मात्र पोहता येत नसल्याने या पाच जणींचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

मृतांमध्ये राधाबाई धोंडिबा आडे (४५), दिक्षा धोंडिबा आडे (२०), काजल धोंडिबा आडे (१६, सर्वजण रा. रामापूर तांडा, ता. पालम, जि. परभणी), सुषमा संजय राठोड (२१), अरुणा गंगाधर राठोड (२५, दोघीही रा. मोजमाबाद तांडा, ता. पालम, जि. परभणी) यांचा समावेश आहे. गावकऱ्यांनी तलावाकडे धाव घेऊन बुडालेल्या पाच जणींना पाण्याबाहेर काढून वाचविण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

## आंबेत पूल बंद असल्याने कोकणात जाणाऱ्या प्रवाशांचे हाल



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना जोडणारा आंबेतचा पूल दुरुस्तीच्या कामासाठी वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. त्यामुळे कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांची मोठी गैरसोय होत आहे. तिथे बोटीची व्यवस्था करण्यात आली आहे, मात्र ती अपुरी पडते आहे. त्यामुळे प्रवाशांना असह्य उकाडा सहन करीत तासन्‌तास बोटीची प्रतीक्षा करावी लागत आहे.

रायगड जिल्ह्यातून रत्नागिरीतील दापोली, मंडणगड व खेड या तीन तालुक्यांना जोडणारा सावित्री नदीवरील आंबेतचा पूल सन १९७८मध्ये बांधण्यात आला. तो पूल धोकादायक बनल्याने दुरूस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतले होते. सुमारे १२ कोटी रुपये खर्चून या पुलाची दुरुस्ती करण्यात आली. यासाठी जवळपास वर्षभर वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. दुरुस्तीनंतर गणेशोत्सवापूर्वी हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला, मात्र आता पुन्हा एकदा पुलाचे काही खांब पश्चिम दिशेला झुकले असल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून हा पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. (पान २ वर..)

## उद्धव ठाकरेंनी अखेर आळवला हिंदुत्वाचा राग

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची शनिवारी (दि. १४) मुंबईत सभा झाली. काँग्रेस, राष्ट्रवादीसोबत सत्तेत असलेल्या ठाकरे यांनी राज्यातील हिंदुत्ववादी वातावरण पाहून आम्ही हिंदुत्व सोडलेले नाही, असे सांगत बाजू सांभाळून घेण्याचा प्रयत्न या वेळी केला.

या सभेत ठाकरे यांनी विकास, प्रगतीवर बोलण्याऐवजी टीका-टिपण्णीवरच भर दिला.

## ...तेव्हाच तुमचे हिंदुत्व मान्य करू

### खासदार नवनीत राणांचे उद्धव ठाकरेंना आव्हान

**मुंबई : प्रतिनिधी**

हनुमान चालिसा म्हणणे राजद्रोह आहे, तर औरंगजेबाच्या कबरीवर फुले अर्पण करण्याला काय म्हणाल? आज छत्रपती संभाजी महाराजांची जयंती आहे. त्यांच्याविरोधात हार अर्पण केले जात असतील, तर हिंदुत्ववादी मुख्यमंत्री कुठे गेले, असा सवाल खासदार नवनीत राणा यांनी उद्धव ठाकरेंना केला आहे.

एमआयएमचे नेते अकबरूद्दीन ओवेसी व इतरांनी खुलताबाद येथील औरंगजेबच्या कबरीचे दर्शन घेतले. त्यामुळे वाद निर्माण झाला आहे. यावरून खासदार राणांनी मुख्यमंत्री ठाकरेंवर निशाणा साधला आहे. त्यांनी मला वज्र द्या, मी दात तोडण्याचे काम करेन, असे सांगितले आहे. माझ्या महाराष्ट्राच्या जनतेचे दात तोडण्याची गरज नाही. तोडायचे असतील, तर औरंगजेबाच्या कबरीवर जाऊन फुले अर्पण करणाऱ्यांचे तोडून दाखवा. तेव्हाच तुमच्यात हिंदुत्व जिवंत आहे यावर आमचा विश्वास बसेल, असे खासदार राणा म्हणाल्या.

## निवडक

### आयपीएल मॅच फिक्सिंग, सट्टेबाजीप्रकरणी तिघे ताब्यात

**नवी दिल्ली** : आयपीएलचा पंधरावा हंगाम जोमात सुरू असताना दुसरीकडे सीबीआयने २०१९मधील मॅच फिक्सिंग आणि सट्टेबाजीच्या आरोपाखाली तीन संशयितांना ताब्यात घेतले आहे. गुर्राम सतिश, गुर्राम वसू (हैदराबाद) आणि दिलीप कुमार (दिल्ली) अशी या आरोपींची नावे आहेत. त्यांना पाकिस्तानमधून सूचना मिळत असल्याचाही संशय आहे.

### ज्येष्ठ नेत्याचा काँग्रेसला फेसबूक लाईव्हवरून गूडबाय

**चंदिगड** : राजस्थानातील उदयपूरमध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय पातळीवरील चिंतन शिबिर सुरू असताना दुसरीकडे पंजाबमध्ये पक्षाला मोठा धक्का बसला आहे. ज्येष्ठ नेते आणि माजी प्रदेशाध्यक्ष सुनील जाखर यांनी पक्ष सोडला आहे. फेसबूक लाईव्हमध्ये गूडलक आणि गूडबाय म्हणत त्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत असल्याचे जाहीर केले.

## शिवसेना विकासकामांचे श्रेय लाटतेय -छगन भुजबळ



**नाशिक, मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या तीन पक्षांचे महाविकास आघाडी सरकार असले तरी या पक्षांमध्ये सातत्याने खटके उडताना दिसतात. अशाच प्रकारे आता पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांच्या नाशिक दौऱ्यावरून अन्न व नागरी पुरवठामंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री छगन भुजबळ यांनी शिवसेनेवर टीका केली आहे. शिवसेना विकासकामांचे श्रेय लाटत असून आदित्य ठाकरेंनीसुद्धा आधी चौकशी करावी, असे मंत्री भुजबळ यांनी म्हटले आहे.

आदित्य ठाकरे नाशिक जिल्ह्यातील दुर्गम भागांना भेट देत विविध ठिकाणी सुरू असलेल्या कामांचा स्थानिक शिवसेना नेत्यांसोबत आढावा घेत आहेत, मात्र कामांवरून शिवसेना श्रेय लाटत असल्याचे सांगत नाशिकचे पालकमंत्री छगन भुजबळ यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

माध्यमांशी संवाद साधताना मंत्री भुजबळ यांनी म्हणाले की, काल ज्या ठिकाणी बोर्ड लावण्यात आले ते काम आधीपासून चालू आहे. काम सुरू झाल्यावर तिथले एक दोन लोक काही तरी सांगतात. त्याच्यानंतर आदित्य ठाकरेंना सांगितल्यावर ते इथे येतात. काम सुरू झालेले असते, पण नंतर दाखवायचे की हे काम शिवसेनेने केले. हे बरोबर नाही. यामुळे जिल्हा प्रशासन, ग्रामविकास खाते काहीच काम करीत नाही असा त्याचा अर्थ होतो.

## स्व. माताजींना अभिवादन



**पनवेल : देवसागर साधक समाज (इंचगिरी संप्रदाय) संचलित शिवाजीनगर येथील श्री बाळकृष्ण महाराज आध्यात्मिक ज्ञानमंदिरात स्व. माताजी भागूबाई चांगू ठाकूर यांचा आठवा पुण्यतिथी कार्यक्रम झाला. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्व. माताजींना अभिवादन केले.** **(वृत्त पान ३ वर..)**

## पनवेलमधील केळवणे येथे आज विविध कामांचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील जलजीवन मिशन अंतर्गत देशात हर घर नल, हर घर जल हे अभियान राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत पनवेल तालुक्यातील केळवणे येथे ७९ लाख ३३ हजार रुपयांची नळ पाणीपुरवठा योजना आणि आठ लाख ८८ हजारांच्या अंतर्गत गटार बांधण्याच्या कामाचा भूमिपूजन समारंभ रविवारी (दि. १५) होणार आहे.

या कामांचा शुभारंभ भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण विधानसभा मतदासंघाचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते तसेच भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत व जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या योजनेंतर्गत केळवणे गावामध्ये प्रत्येक घरात पाणी मिळणार असल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण असून त्यांनी भारतीय जनता पक्षाचे आभार मानले आहेत.

दोनच दिवसांपूर्वी पनवेल तालुक्यातील पळस्पे येथे हर घर नल, हर घर जल योजनेचे भूमिपूजन झाले होते. अशा प्रकारे ठिकठिकाणी केंद्र सरकारच्या या योजनेचा लाभ ग्रामस्थांना होत असल्याचे पहावयास मिळत आहे.

देशातील प्रत्येक खेड्यापाड्यातील घरात पाण्याचा नळ उपलब्ध करून देण्याची ही योजना केंद्र सरकार राबवित आहे. १५ ऑगस्ट २०१९ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जल जीवन मिशनची घोषणा केली. या अंतर्गत प्रत्येक घरात नळाद्वारे पाणी पुरविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## कर्जतच्या 'वळण'चे पुरस्कारांचे अर्धशतक

### ५० पुरस्कार पटकाविणारी रायगडातील पहिली शॉर्टफिल्म

**कर्जत : प्रतिनिधी**

कोलकाता येथील मानाच्या अशा ग्रेट इंडियन शॉर्ट फिल्म फेस्टिवल अवार्ड सिझनमध्ये बेस्ट चिल्ड्रेन्स फिल्म म्हणून शॉर्टफिल्म वळणला प्रथम पारितोषिक मिळाले. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील ५० पुरस्कार मिळविणारी वळण ही एकमेव शॉर्टफिल्म ठरली आहे.

'वळण'ची कथा, पटकथा व दिग्दर्शन कर्जत दहिवलीमध्ये राहणारे प्रदीप गोगटे यांचे आहे. ते गेली अनेक वर्षे उत्कर्ष प्रोडक्शनच्या माध्यमातून लहान मुलांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी शिबिरांचे आयोजन करीत असतात. त्यांनी आपल्या शिबिरार्थींमधून बालकलाकारांची निवड करून वळण शॉर्टफिल्मची तयारी केली. यामध्ये सिनेफोटोग्राफी हृषिकेश दांडेकर, एडिटिंग प्रथमेश जाधव, संगीत संजय पाठक, वेशभूषा अभय शिंदे, पोस्टर डिझाइन्सची जबाबदारी माधुरी गोगटे यांनी सांभाळली. प्रोडक्शन टीम म्हणून दिलीप गोगटे, बाबू सकपाळ, नितेश कोळी, तुकाराम जाधव, मोहित जाधव, शुभम कलघटकी, निचिकेत लाड यांनी काम पाहिले.



वळण शॉर्टफिल्मचे चित्रण कर्जत तालुक्यातील आवळस, नेवाळी भागात करण्यात आलेले आहे. 'वळण'मध्ये राज साळवी, ऋत्वी ओसवाल, साईराज खंडागळे, आरवी ओसवाल, स्पंदन पडते, राजवी डोंबे, स्फूर्ती पडते या बालकलाकारांसोबत पूजा बंदरकर, आरती, विशाल रोकडे, दिगंबर म्हसकर, शर्वरी जाधव, हेमंत वाघुले यांनी भूमिका साकारल्या आहेत. 'वळण'ला २१ आंतरराष्ट्रीय आणि २९ राष्ट्रीय अवॉर्ड मिळालेत तसेच प्लॅनेट मराठी शॉर्टफिल्म फेस्टिव्हलमध्ये अंतिम फेरीत निवड झाली आहे.

> **वळण शॉर्टफिल्मला ५० अवॉर्ड मिळणे ही गोष्ट अविस्मरणीय क्षणांपैकी एक आहे. यासाठी सर्व सहकाऱ्यांचे मला चांगले सहकार्य लाभले. भविष्यात असेच अनेकोत्तम प्रोजेक्ट साकारण्याचा मानस आहे.**
>
> **-प्रदीप गोगटे, दिग्दर्शक**

## दोन युद्धनौकांचे संरक्षणमंत्र्यांच्या हस्ते मंगळवारी होणार जलावरण

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय नौदलाच्या ताफ्यात 'सुरत' आणि 'उदगिरी' या दोन युद्धनौका दाखल होणार आहेत. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत १७ मे रोजी मुंबईतील माझगाव गोदीमध्ये या युद्धनौकांचे जलावरण होणार आहे.

'सूरत' ही विनाशिका, तर 'उदगिरी' असे फ्रिगेटचे नाव आहे. अर्थात, या युद्धनौका प्रत्यक्ष नौदलाच्या सेवेत दाखल होतील तेव्हा त्यांना ही संबंधित नावे देण्यात येतील. माझगाव गोदीने आतापर्यंत अनेक युद्धनौकांची बांधणी केली असली तरी दोन युद्धनौकांच्या जलावरणाचा एकत्रित सोहळा पहिल्यांदाच होत आहे. दोन्ही युद्धनौका काही मिनिटांच्या अंतराने गोदीतून विशिष्ट पद्धतीने पहिल्यांदाच पाण्यात उतरवल्या जातील.

भारतीय नौदलात ठराविक कालावधीनंतर विविध प्रकारच्या युद्धनौका निवृत्त होत असताना त्यांची जागा नवीन युद्धनौका घेत असतात. काळानुसार बदलत्या तंत्रज्ञान व युद्धरणनितीनुसार अनेक बदल करीत नव्या युद्धनौकांची उभारणी केली जाते. याचाच एक भाग म्हणून देशातील विविध गोदींमध्ये युद्धनौकांची बांधणी युद्धपातळीवर सुरू आहे.

यापैकी 'सुरत' ही विशाखापट्टणम वर्गातील युद्धनौका म्हणून ओळखले जाते. यातील पहिली युद्धनौका गेल्या वर्षी नौदलात दाखल झाली असून इतर दोन युद्धनौकांच्या समुद्रातील चाचण्या सुरू आहेत, तर या वर्गातील शेवटची व चौथी युद्धनौका 'सुरत'चे जलावरण होत आहे. आंध्र प्रदेशमधील डोंगररांगेवरून 'उदगिरी' असे युद्धनौकेचे नामकरण करण्यात आले आहे. पाणबुडीविरोधी कारवाईची मुख्य जबाबदारी या वर्गातील युद्धनौकांवर असते.

# शेतकरी आत्महत्यांना राज्य सरकार जबाबदार

## ■ स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांचे टीकास्त्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्येला राज्य शासन जबाबदार आहे, असा घणाघाती आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केला. दरम्यान आणखी किती शेतकऱ्यांचे मुडदे पाडून हे शासन कारभार करणार आहे, असा संतप्त प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे.



गेवराई तालुक्यातील नामदेव जाधव या ३५ वर्षीय ऊस उत्पादक शेतकऱ्याने नुकतीच आत्महत्या केली आहे. त्यांच्या शेतातील दोन एकर ऊस साखर कारखान्यांने गळीतास नेला नाही. त्यासाठी पैशाची मागणी केली जात होती. त्यातून आलेल्या नैराश्याने जाधव यांनी आत्महत्या केली. यांच्या या आत्महत्येला जबाबदार असणारे अधिकारी, मुकादम, ऊसतोडणी मशीन चालक यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी शेट्टी यांनी या वेळी केली.

शेट्टी पुढे म्हणाले, की वास्तविक मराठवाड्यामध्ये यंदा अतिरिक्त ऊस आहे याची शासनाला कल्पना होती. पाणी टंचाई निर्माण झाली, की विहिरी ताब्यात घेऊन त्यातील पाणी शासन उपसा करीत असते. यावर बंधने आली पाहिजेत. या प्रमाणे साखर कारखाने बंद झाले आहेत अशा सक्षम साखर कारखान्यांकडे अतिरिक्त ऊस गाळपासाठी दिला असता तर अतिरिक्त उसाची समस्या निर्माण झाली नसती. त्यातून जाधवसारख्या शेतकऱ्यावर आत्महत्या करण्याची वेळ आली नसती. या आत्महत्येस राज्य राज्य शासन जबाबदार आहे.

# राज्यातील विविध प्रश्न उपस्थित करीत आ. नितेश राणेंची ठाकरे सरकारवर टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील विविध प्रश्न उपस्थित करत भाजप आमदार नितेश राणे यांनी ट्विट करत केंद्रावरच आता जबाबदारी ढकलणार का ते आम्हाला आता पाहायचे आहे असे आव्हान दिले आहे. मुंबईतील बीकेसी मैदानावरील शिवसेनेच्या जाहीर सभेच्या पार्श्वभूमीवर राणे बोलत होते.



याबरोबरच त्यांनी मुख्यमंत्री ठाकरे यांना चार प्रश्न विचारले आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील हिंदूंना धमकी देणाऱ्या आणि औरंगजेबाचा उदोउदो करणाऱ्या ओवैसीवर गुन्हे दाखल करून अटक करणार का? महाराष्ट्रात निर्माण झालेला अतिरिक्त ऊसाचे गाळप करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देणार की कारखानदारांचा बचाव करणार? शेतकऱ्यांचा पीकविमा बुडवणाऱ्या पीक विमा कंपन्यांवर कारवाई करणार का? महाविकास आघाडी सत्तेत आल्यावर मेगा नोकर भरतीची घोषणा ही फक्त बेरोजगार युवकांसाठी गाजर होती असे मान्य करणार का? असे अनेक सवाल नितेश राणे यांनी या वेळी उपस्थित केले आहेत.

# पाणीसाठा दिवसेंदिवस खालावतोय

## ■ मुंबईकरांसाठी जलाशयांत २३ टक्केच पाणी शिल्लक

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्यावर्षी चांगला पाऊस पडला असला तरी वाढत्या उन्हामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही जलाशयांतील पाणीसाठा खालावत असून सध्या तो २३.६९ टक्के इतकाच आहे. गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत सध्याचा पाणीसाठा थोडा जास्त असला तरी तापमान वाढत असल्याने त्यात आणखी घट होण्याची शक्यता आहे. एप्रिलच्या सुरुवातीला तलावांमध्ये ४० टक्के पाणीसाठा होता. मात्र महिन्याभरात १७ ते १८ टक्के साठा कमी झाल्याची माहिती पालिकेतील सूत्रांनी दिली.

उन्हाचा तडाखा वाढू लागल्यामुळे ठिकठिकाणी पाण्याची मागणीही वाढू लागली आहे. तळपत्या सूर्यामुळे बाष्पीभवन मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याने जलशयांची पातळी कमी होऊ लागली आहे. यंदा पावसाचे आगमन लवकर होण्याचा अंदाज असला तरी धरणांतील साठ्यांत वाढ होण्याइतका पाऊस पडेपर्यंत मुंबईकरांना पाणी जपून वापरावे लागेल.

### ■ पाणी जपून वापरण्याचे आवाहन

***कपातीची शक्यता नाही असे सांगण्यात येत आहे. दरम्यान यावर्षी पाणीकपातीची शक्यता नसली तरी जून आणि जुलैमध्ये किती पाऊस पडतो त्यावरही कपातीचा निर्णय अवलंबून असतो. सध्या कपातीचे संकट नसले तरी मुंबईकरांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन पालिकेच्या जल अभियंता विभागाने केले आहे.***

गेल्यावर्षी चांगला पाऊस पडला. त्यामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणारे जलाशय काठोकाठ भरले होते. सर्व धरणांत ९९ टक्के पाणीसाठा असल्यामुळे वर्षभराची चिंता मिटली होती. मात्र मेच्या मध्यावर हा साठा २३ टक्क्यांवर आला आहे. पावसाळा सुरू होईपर्यंत म्हणजे एक दीड महिना या पाणीसाठ्यावर मुंबईकरांची मदार असणार आहे.

उर्ध्व वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार, तुळशी अशा सात धरणातून मुंबईला दर दिवशी ३८५० दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. सातही जलाशयांतील पाणीसाठा १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटरवर पोहोचल्यानंतर मुंबईकरांना पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करणे शक्य होते. तसेच जलाशयांतील उपलब्ध पाणीसाठा ३१ जुलैपर्यंत पुरेल यादृष्टीने पालिकेच्या जल अभियंता खात्याला नियोजन करावे लागते. १ ऑक्टोबरला सर्व जलाशय पूर्ण भरले तर वर्षभर पाणीपुरवठा सुरळीत राहतो. तलाव पूर्ण क्षमतेने भरले नाहीत, तर पाणीकपात करण्याची दाट वेळ येते.

# पाली प्राथमिक आरोग्य केंद्राचा गलथान कारभार

## ■ रिकाम्या ऑक्सिजन सिलिंडरमुळे रुग्णांची फरपट

**पाली : प्रतिनिधी**

पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात शुक्रवारी (दि. १३) रात्री ऑक्सिजन कमी झालेल्या तरुण रुग्णाला उपचारासाठी दाखल करण्यात आले होते, मात्र या ठिकाणी असलेले ऑक्सिजनचे सिलिंडर रिकामे असल्याने या रुग्णाची फरपट झाली. अखेर खासगी दवाखान्यातून ऑक्सिजन सिलिंडर आणून या रुग्णाला रुग्णवाहिकेतून कळंबोली येथे रुग्णालयात नेण्यात आले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गौरव ओसवाल हा तरुण पाली पोलीस स्टेशनमध्ये कारागृहात होता. या वेळी त्याला श्वासोच्छवास घेण्यास त्रास होऊ लागला. त्याच्या ऑक्सिजनची पातळी खाली गेली. त्यामुळे पोलिसांनी त्याला पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आणले, मात्र प्राथमिक आरोग्य केंद्रात असलेले सहा ऑक्सिजनचे सिलिंडर चक्क रिकामे होते.

अशावेळी ऑक्सिजनअभावी या रुग्णास त्रास होत होता.



(छाया : गौसखान पठाण)

त्यानंतर काही वेळाने येथील डॉक्टर नितीन दोशी यांच्या रुग्णालयातून ऑक्सिजन सिलिंडर आणून रुग्णाला लावण्यात आला. रुग्णवाहिकेतून या रुग्णाला कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. या वेळी रुग्णासोबत डॉ. उमाकांत जाधव उपस्थित होते.

या दरम्यानच्या काळात रुग्णाचे नातेवाईक व नागरिक पाली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात जमा झाले होते. कोविड काळात अनेक सामाजिक संस्था व दानशूर व्यक्तींनी प्राथमिक आरोग्य केंद्रात मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन सिलेंडर, औषधे व इतर साधनसामग्री दिली होती, मात्र या सर्व साधनसामग्रीचा योग्य प्रकारे वापर व देखभाल होत नसल्याचे बोलून उपस्थित नागरिकांनी संताप व्यक्त केला. त्यामुळे येथे काहीकाळ तणावदेखील निर्माण झाला होता. या वेळी येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक तृप्ती बोराटे व इतर पोलीस उपस्थित होते.

दरम्यान, गंभीर रुग्णांना तातडीने रुग्णसेवा मिळाली पाहिजे अशी मागणी यादरम्यान सुरु होती.

> **या घटनेची दखल घेतली असून, पुन्हा अशी घटना घडू नये यासाठी संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. रिकामे ऑक्सिजन सिलिंडर तात्काळ भरून रुग्णांसाठी उपलब्ध करण्यात येतील. पुन्हा अशी घटना घडल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.**
> **–शशिकांत मढवी, तालुका आरोग्य अधिकारी, सुधागड**





**मुंबई–गोवा महामार्गावर पळस्पे येथे कंटेनर आडवा झाल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. यामुळे ये–जा करणारी वाहने महामार्गावर अडकून पडली होती.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

# पळसदरी ठाकूरवाडीत कौशल्य विकास मार्गदर्शन शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पळसदरी ठाकूरवाडी येथील आदिवासी समुदायासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने कौशल्य विकास मार्गदर्शन शिबिर झाले.

या शिबिराचे आयोजन ॲड. प्रदीप सुर्वे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे विद्यार्थी समाज कार्यकर्ते तेजल पाटील, सुमित गायकवाड, करुणा कदम यांनी केले होते. शिबिरात कर्जत तहसीलदार विक्रम देशमुख यांनी कौशल्य विकासाची गरज, शिक्षणाची गरज, कौशल्याची गरज यावर मार्गदर्शन केले. तर आरोग्य अधिकारी डॉ. चंद्रमुनीमोरे, पवाळी, देवडेकर यांनी कौशल्याचे महत्त्व सांगितले. या शिबिराचे सूत्रसंचालन तेजल पाटील यांनी केले. या वेळी शिबिरास पळसदरी ग्रामपंचायतीचे सरपंच जयेंद्र देशमुख, सदस्य नेत्र दरेकर, सुवर्णा पीरकर,तसेच सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र दरेकर, ज्ञानेश्वर सुर्वे, वामन होला, बाळू पीरकर, गवरणाठ उघडा, ग्रामसेवक राहुल लंगोटे, ओक वनौषधी प्रतिष्ठानचे सामाजिक कार्यकर्ते दीपक दळवी आदींसह ग्रामस्थ महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार तेजल पाटील यांनी मानले.




# रत्नागिरीत मगर दर्शन सफारीचा उपक्रम

**नागपूर : प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांत कांदळवन कक्षाने अनेक नवे उपक्रम राबवले असून पहिल्यांदाच खारफुटीच्या जंगलात मगर सफारीचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. राज्यातील रत्नागिरी जिल्ह्यातील घनदाट खारफुटीच्या जंगलात मागील आठवड्यात अशा सफारीला सुरुवात झाली.

राज्य वनविभागाच्या खारफुटी आणि सागरी जैवविविधता संवर्धन प्रतिष्ठानने सोनगावला पर्यटन वाढीसाठी व खारफुटी, सागरी जैवविविधता संवर्धनाला प्रोत्साहन देण्यासाठी समुदाय–आधारित संवर्धन उपक्रम हाती घेतला. खारफुटीच्या पायवाटेवर पर्यटकांना घेऊन जाण्यासाठी ३० ग्रामस्थांची नेमणूक, बोटीवरून फिरणे, मगर पाहणे, पक्षी निरीक्षण तसेच सोनगाव गावात वास्तव्याची सोय करून देण्यात आली आहे. सोनगावात सकाळी साडेसात ते सायंकाळी सहा वाजता दरम्यान मगर सफारी केली जाते. ती कमी भरतीवर अवलंबून असते. कारण कमी भरतीच्यावेळी मगरी मोठ्या प्रमाणात दिसतात. या ३० गावकऱ्यांना सुमारे सहा महिने प्रशिक्षण देण्यात आले. वशिष्ठी नदीच्या खाडीमध्ये बोटीमध्ये सुमारे २० मगरी दिसतात, असे स्थानिकांचे म्हणणे आहे. २०१९ ते २०२१ दरम्यान केलेल्या सर्वेक्षणात, इला फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेला गड आणि वाशिष्ठी नद्यांमध्ये १०७ मगरी आढळल्या. सोनगावातील तरुण रोजगाराच्या शोधात शहरांकडे स्थलांतर करीत आहे.

पान १ वरून

## आंबेतचा पूल बंद असल्याने कोकणात जाणाऱ्या प्रवाशांचे हाल

पुलावरील वाहतूक पूर्णपणे बंद ठेवल्याने एसटी महामंडळाच्या बसेसअभावी नागरिक, विद्यार्थी तसेच पर्यटकांची मोठी गैरसोय होत आहे. मंडणगड, दापोली तालुक्यांत जाणाऱ्या प्रवाशांना मोठा वळसा घालून महाडमार्गे जावे लागत आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी येथे प्रवासी आणि वाहने वाहून नेणाऱ्या दोन बोटी शासनाने उपलब्ध करून दिल्या आहेत, मात्र सध्या उन्हाळी सुटीमुळे या मार्गावर प्रवासी आणि वाहनांची संख्या मोठी असल्याने प्रवाशांना तिष्ठत बसावे लागत आहे.

सावित्री नदीवर आंबेत या ठिकाणी नवीन पूल उभारावा, अशी स्थानिकांची मागणी केली आहे. तसा प्रस्ताव संबंधित विभागाकडून राज्य सरकारकडे गेलेला आहे, मात्र अद्याप या प्रस्तावाला मंजुरी मिळू शकलेली नाही. त्यामुळे संताप व्यक्त होत आहे.

# आता १२ भाषांमध्ये अभियांत्रिकी अभ्यासक्रम

**पुणे : प्रतिनिधी**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) अभियांत्रिकी अभ्यासक्रम १२ भारतीय भाषांमध्ये उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी सध्या इंग्रजीमध्ये असणाऱ्या अभ्यासक्रमाच्या भाषांतरासाठी अभियांत्रिकीचे शिक्षक आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांची मदत घेतली जाणार असून, भारतीय भाषांमध्ये भाषांतरित होणारे अभ्यासक्रम केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या स्वयम् या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जातील.

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये मातृभाषेतून शिक्षणावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे एआयसीटीईने पदवीपूर्व स्तरावरील अभियांत्रिकी अभ्यासक्रम शिकण्यासाठी मातृभाषेचा पर्यायही गेल्या वर्षी दिला होता. त्यानुसार देशभरातील काही महाविद्यालयांनी मातृभाषेतून अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू केले आहेत.

### ■ असा होणार बदल

***अभियांत्रिकीचे ८० अभ्यासक्रम बारा भारतीय भाषांमध्ये उपलब्ध करण्याचे निर्देश एआयसीटीई आणि आयआयटी मद्रास यांना देण्यात आले आहेत. बंगाली, गुजराती, कन्नड, मल्याळम, मराठी, तमीळ, हिंदी, तेलुगू, आसामी, ओडिया, पंजाबी आणि उर्दू या भाषांमध्ये अभ्यासक्रमांचे भाषांतर करण्यात येईल.***

८० अभ्यासक्रमांपैकी २१ ऑनलाइन अभ्यासक्रमांचे भाषांतर करण्याचे काम एआयसीटीईकडे देण्यात आले होते.

यापैकी प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या तीन अभ्यासक्रमांचे काम एआयसीटीईने पूर्ण केले आहे, तर अन्य तीन स्वयम् ऑनलाइन अभ्यासक्रम आठ भारतीय भाषांमध्ये भाषांतरित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर अन्य अभ्यासक्रमांचे काम पूर्ण करण्यासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आणि शिक्षकांची मदत घेतली जाणार असल्याचे एआयसीटीईने नमूद केले आहे.

**मानधन आणि प्रमाणपत्र**

भाषांतराचे काम करण्यासाठी पदव्युत्तरचे विद्यार्थी आणि शिक्षकांना एका भाषेसाठी प्रति तास साडेतीन हजार रुपये या दराने मानधन एआयसीटीईने निश्चित केले आहे. विद्यार्थी आणि शिक्षकांना त्यांच्या आवडीची भाषा निवडता येईल. भाषांतराचे काम पूर्ण झाल्यावर भाषांतरकारांना प्रमाणपत्रही प्रदान केले जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# सोमटणे रेल्वेफाटकाजवळ गुटख्याचा साठा हस्तगत

## टेम्पोसह पाच लाख १६ हजारांचा माल जप्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाने तालुक्यातील सोमटणे रेल्वे फाटकाजवळ एका टेम्पोत बेकायदेशीररित्या साठा केलेला पाच लाख १६ हजार ६५० रुपये किमतीचा गुटखा जप्त घेतला आहे.




यासंदर्भात खास बातमीदाराकडून वपोनि. रवींद्र दौंडकर यांना एका टेम्पोमध्ये बेकायदेशीररित्या दोघांनी प्रतिबंधित गुटख्याचा साठा करून ठेवल्याची माहिती मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) अंकुश खेडकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक भोईर, सहाय्यक पोलीस निरीक्षक धनश्री पवार, पोलीस नाईक गणेश सांबरे व त्यांच्या पथकाने त्या ठिकाणी छापा टाकून टेम्पो ताब्यात घेतला आहे. त्यामध्ये पाच लाख १६ हजार ६५० रुपयांचा गुटखा हस्तगत केला आहे. आरोपींविरोधात विरुद्ध भा. दं. वि. कलम १८८, २७२, २७३, ३२८, ३४सह अन्न सुरक्षा मानदे अधिनियम २००६मधील कलम २६ (२) (आय), २६ (२) (आयव्ही) व कलम २७ (२) (ई), ५९ (२)प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निवडक

### पनवेलमधून दुचाकीची चोरी

**पनवेल** : पनवेल शहरातून ॲक्टीव्हा दुचाकीची चोरी झाल्याची घटना घडली आहे. भुपेंद्र शेलार (३०) यांनी त्यांची १० हजार रुपये किंमतीची ॲक्टीव्हा फोर जी दुचाकी (क्र. एमएच ४६ बीएच ०८३०) ही प्रतिम हॉस्पिटलच्या बाजूला उभी करून ठेवली असता, अज्ञाताने चोरून नेली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### मृत वृद्धेच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल** : बेलापूर ते पनवेल रेल्वेस्टेशन दरम्यान रेल्वे लाईन क्रॉस करताना रेल्वेची धडक लागून एका ६० वर्षीय वृद्ध महिलेचा मृत्यू झाला. या महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. २५ एप्रिल रोजी ही वृद्ध महिला रेल्वेलाईन क्रॉस करीत असताना बेलापूर ते पनवेल दरम्यान तिला रेल्वेची धडक लागून ती जखमी झाली. तिला उपचारासाठी पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र त्याआधीच तिचा मृत्यू झाला होता. या महिलेची उंची अंदाजे ४ फूट ८ इंच, अंगाने सडपातळ, डाव्या हातावर अस्पष्ट गोंदलेले व अंगात मळकट सफेद हाफ शर्ट व फिक्कट भगवी लुंगी परिधान केली आहे.

### ज्येष्ठ नागरिकाचा मोबाईल लंपास

**पनवेल** : एका ज्येष्ठ नागरिकांच्या मोबाईलची चोरी झाल्याची घटना शहरातील रोज बाजार परिसरात घडली. राम विश्वकर्मा (७२) हे बाजारपेठेत भाजी आणण्याकरिता गेले असता गुणे हॉस्पिटलच्या बाजूला असलेल्या रोज बाजार परिसरात त्यांचा ५ हजार रुपये किंमतीचा मोबाईल फोन अज्ञात चोरट्याने चोरला. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

### महिलेशी अश्लिल वर्तन; गुन्हा दाखल

**पनवेल** : एका महिलेच्या घरात घुसून तिच्याशी अश्लिल कृत्य केल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मोहतसीम कच्छी (२८) याने कच्छी मोहल्ला येथील एका महिलेच्या घरात घुसून तिच्याशी अश्लिल वर्तन केल्याची तक्रार महिलेने पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली आहे.



**पनवेल : माजी नगराध्यक्ष व भाजप नेते संदीप पाटील यांना वाढदिवसानिमित्त शुक्रवारी मयूर कदम यांनी शुभेच्छा दिल्या.**

# प्रोटोन थेरपी ठरणार वरदान

## केंद्र सरकारच्या टॉनॉमिक सेंटरची गरीब कर्करुग्णांसाठी योजना

**खारघर : रामप्रहर वृत्त**

*खारघरमधील रुग्णालयात जवळपास ७०० कोटींचा हा संपूर्ण प्रकल्प आहे. प्रोटोन थेरपीदरम्यान रुग्णाला शरीरात थकवा जाणवत नाही. देशातील सामान्यांनादेखील या पद्धतीचा लाभ घेता येणार असून केंद्रात दररोज साधारण ५० रुग्णांवर थेरपीद्वारे उपचार होऊ शकतात.*

कर्करोगावर प्रभावी ठरणारी प्रोटोन थेरपी उपचार पद्धती आता खारघरच्या टाटा रुग्णालयात येत्या सप्टेंबर महिन्यात सुरू होणार आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या रुग्णांना अत्यल्प अथवा मोफत हे उपचार घेता येणार आहेत.

खारघर टाटा रुग्णालय परिसरात ६,५०० चौरस फूट जागेवर उभारण्यात येणारी अद्ययावत वास्तू कर्करोग रुग्णांसाठी वारदानच ठरणार आहे.

भारत सरकारच्या टॉनॉमिक सेंटरतर्फे ही प्रोटोन थेरेपी सुरू असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना अत्यल्प दरात उपचार उपलब्ध होणार आहेत.

कर्करोग झालेल्या रुग्णांसमोर किमो, सर्जरी आणि रेडिएशन थेरपी हे पर्याय असतात, पण रेडिएशन प्रकारात मोडणारी प्रोटोन थेरपी सर्वात अत्याधुनिक मानली जाते. भारतात यासाठी साधारण ४० लाखांचा खर्च येतो, मात्र आर्थिकदृष्ट्या कमजोर गटासाठी ही सुविधा मोफत मिळू शकणार आहे.

इतर उपचार पद्धतीमध्ये रुग्णांच्या ट्यूमरसोबत इतर निरोगी पेशींनाही हानी पोहचते तसेच शरीरावर डाग राहतात, पण प्रोटोन बीममध्ये केवळ ट्यूमरला लक्ष्य केले जाते. इतर ऑपरेशनला वेळ जास्त लागतो. शिवाय रुग्णाला त्रास जाणवतो, पण प्रोटोन थेरपीमध्ये तुलनेत वेळ कमी लागतो. केस गळती होत नाही.

## स्व. माताजी भागूबाई चांगू ठाकूर यांना अभिवादन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देवसागर साधक समाज इंचगिरी संप्रदाय संचलित शिवाजीनगर येथील श्री बाळकृष्ण महाराज आध्यात्मिक ज्ञानमंदिरात स्व. माताजी भागूबाई चांगू ठाकूर यांचा आठवा पुण्यतिथी कार्यक्रम शुक्रवारी (दि. १३) झाला.

या कार्यक्रमाला बाळकृष्ण महाराज संगीत भजन, बाळासाहेब महाराज प्रवचन, विश्यंभर भजन मंडळ, भावभक्ती महिला मंडळ, संत जनाबाई भजन मंडळ, माऊलीची आरती, नाच ग घुमा पनवेल प्रस्तुत महिला कलाकारांनी केलेले नाटक सादर करण्यात आले. या कार्यक्रमात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी माताजींना अभिवादन केले.

या वेळी शकुंतला ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पंचायत समिती सदस्य तथा महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, ग्रामपंचायत सदस्य विजय घरत, अरुणशेठ ठाकूर, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, भरतशेठ ठाकूर, वसंतशेठ पाटील,स्वप्नील ठाकूर, सागर ठाकूर, अनिकेत घरत, प्रतिभा भोईर, विजय घरत, सुधीर ठाकूर, जोसका ठाकूर, संजय भगत, अनिल भगत, न्हावा सरपंच हरेश्वर म्हात्रे, अमोघ ठाकूर, रंजनी ठाकूर, ज्योती ठाकूर आदींसह संप्रदायाचे लोक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी भजन तसेच माऊलींवर पुष्पवृष्टी झाली. या कार्यक्रमात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी माताजींच्या आठवणींना उजाळा दिला.



**पनवेल : महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांचे सुपुत्र आदित्य ठाकूर आणि आदेश ठाकूर यांचा वाढदिवस शुक्रवारी शिवाजीनगर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, वर्षा ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर, अर्चना ठाकूर यांच्यासह ठाकूर कुटूंबीय उपस्थित होते.**




**पनवेल : श्रुती पाटील हिने मोरू नारायण म्हात्रे विद्यालयातून येथून आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयातून एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केले. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी कृष्णाशेठ ठाकूर, आशिष पाटील, किशोर पाटील, सत्यवान पाटील, अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भाजप नेते सागरशेठ ठाकूर व ज्योती ठाकूर यांना लग्नाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी नगरसेवक अनिल भगत, भरतशेठ ठाकूर, दीपकशेठ ठाकूर, भारतशेठ ठाकूर, प्रतिक ठाकूर, राज ठाकूर आदी उपस्थित होते.**

## देहरंग धरणातील पाणीपातळी खालावली; मान्सूनची प्रतीक्षा



**पनवेल : प्रतिनिधी**

उन्हाळा दिवसेंदिवस तीव्र होत चालला असून देहरंग धरणात १० ते १२ दिवस पुरेल एवढाच पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. त्यामुळे हवामान खात्याने अंदाज वर्तविल्यानुसार लवकर मान्सून येण्याची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

सद्यस्थितीत पनवेल शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या महापालिकेच्या मालकीच्या देहरंग धरणातील पाण्याची पातळी खालावली आहे. पनवेल शहराला २९ एमएलडी पाण्याची गरज आहे. महापालिकेच्या स्वतःच्या मालकीच्या देहरंग धरणातून मनपा दररोज आठ एमएलडी पाणी घेते. याशिवाय महापालिकेला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण १२ एमएलडी आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाच एमएलडी पाणी विकत घ्यावे लागते.

पाताळगंगा नदीमधून मिळणारे पाणी आठवड्यातून दुरूस्तीचे काम असल्याने एक दिवस मिळत नाही व दुसऱ्या दिवशी कमी दाबाने येते. अशा परिस्थितीत पाणीसमस्येवर मात करण्यासाठी महापालिका सातत्याने प्रयत्नशील आहे.

### भविष्यात अमृत योजनेतून भागणार तहान

*पनवेल महापालिका हद्दीतील गावांना व शहरांना मुबलक पाणी मिळावे याकरिता आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्याने पनवेल महापालिकेला अमृत योजना मिळाली आहे. केंद्र शासन पुरस्कृत असलेल्या अमृत योजनेनुसार महापालिका हद्दीतील २९ महसुली गावांत एकूण ४० पाण्याच्या टाक्या बांधण्यात येणार आहेत. व त्यासोबत गावांमध्ये अंतर्गत एकूण १६५ किलोमीटर नवीन पाईपलाईन जोडणी करण्यात येणार आहे, पण कोरोनामुळे हे काम पूर्ण होण्यास उशीर झाला आहे.*

**देहरंग धरणात पाणी साठवण्याची क्षमता कमी आहे, कारण येथील रचना अशी आहे की, डोंगरातून वरून येणाऱ्या पाण्याबरोबर वाहून येणारा गाळ साचल्याने धरण गाळाने भरते. त्यामुळे पाणी कमी साठते. हा गाळ काढणे खर्चिक आहे आणि तो प्रत्येक वेळी येत असल्याने परवडणारे नाही. आता थोडा जरी पाऊस पडला तरी धरणातून आम्ही आठ एमएलडी पाणी घेतो. त्यामुळे आपल्याला पाऊस पडेपर्यंत पाणी पुरेल.**
**–विलास चव्हाण, उपअभियंता,**
**पाणीपुरवठा विभाग, पनवेल मनपा**

# उन्हाच्या वाढत्या काहिलीत निराला मागणी वाढली

**उरण : वार्ताहर**

मार्च महिन्यापासून उन्हाची काहिली प्रचंड वाढली आहे. त्यामुळे शरीराला थंडावा व ऊर्जा मिळण्यासाठी अनेकांनी शीतपेयांकडे मोर्चा वळवला असून आरोग्यवर्धक निराला अधिक पसंती दिली जात आहे.

शहरातील पेन्शनर पार्क, उरण शेवा चारफाटा, सिडको फाटा जासई ते पुढे पनवेलपर्यंत या मार्गावर आवर्जून नीरा विक्रेत्यांच्या टपऱ्या पाहायला मिळतात. १५ रुपये ग्लास (२०० मिली) दराने मिळत असल्याने स्थानिक नागरिक या आरोग्यवर्धक आणि चविष्ट पेयाला पसंती देतात. सध्या उन्हाचा पारा वाढल्याने नागरिक हैराण आहेत. निरा विक्री ही शासनमान्य असल्याने उरण-पनवेल या रस्त्यावर ठिकठिकाणी निरा विक्री केंद्र सुरू असल्याचे दिसते.

### निरा पिण्याचे फायदे

*नारळाच्या पाण्यासोबत निरा हे पेयही निसर्गाचा चमत्कार समजला जाते. ताड, माड, खजुरी, शिंदी या झाडामधून पाझरणारा हा द्रवपोषक आरोग्यवर्धक आहे. ताडाच्या खोडातून निघणारे पाणी 'निरा' म्हणून सर्वत्र उपलब्ध आहे. ज्यांना हृदयविकार किंवा रक्तदाबाचा त्रास आहे, असे अनेक नागरिक निराचा आस्वाद घेतात. निरामुळे डिहायड्रेशनचा त्रास कमी होण्यास मदत होते. निरा गर्भवती स्त्रीला उपयुक्त आहे. मूत्राशयाचा आजार दूर करते. निरा रक्तही शुद्ध करते.*




# चिरनेर येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

छावा प्रतिष्ठान चिरनेर, युद्धनौका ग्रुप, ग्रामस्थ मंडळ चिरनेर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. १४) चिरनेर कातळपाडा येथे श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी झाली. सकाळी ९ वा. श्री छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, त्यानंतर सकाळी सत्यनारायनाची महापूजा करण्यात आली.

दुपारी ३:३० वा. गावात भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. या वेळी उपस्थित सर्वांनीच पारंपरिक वेशभूषा केली होती. महिला ग्रामस्थांसह लहानग्यांनीही लेझीमवर ताल धरला होता. पुष्पवृष्टी, टाळ- मृदूंग व घोषणा देत पालखी काढण्यात आली. सर्व शिवभक्तांनी पालखी सोहळ्यास उपस्थित राहून छत्रपती संभाजी महाराजांना मानवंदना दिली.





# युईएस कॉलेजमध्ये वार्षिक दीक्षांत समारंभ

**उरण : वार्ताहर**

शहरातील युईएस कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीमध्ये शनिवारी (दि. १४) वार्षिक दीक्षांत समारंभ उत्साहात झाला. दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून युईएस संस्थेचे अध्यक्ष आर्किटेक्ट तनसुख जैन, उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, मानद सचिव आनंद भिंगार्डे, सहसचिव चंद्रकांत ठक्कर, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, सिनिअर कॉलेजच्या एचओडी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि सर्व मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाली. प्रमुख पाहुणे तनसुख जैन यांनी, विद्यार्थ्यांना पुढील भवितव्यासाठी मार्गदर्शन केले तसेच सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्यांनी शैक्षणिक अहवालाचे वचन केले व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

बीएससीआयटी विभागाचे सात आणि कॉमर्स विभागाचे २५ अशा एकूण ३२ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

# थेट नकोच, पण म्युच्युअल फंडांची जोखीम चालेल!

**शेअर बाजारातील जोखीम गेल्या आठवड्यात पाहायला मिळाली, ज्यामुळे नव्या गुंतवणूकदारांची घबराट झाली. ही जोखीम असल्यानेच भारतीय गुंतवणूकदार शेअर बाजारापासून दूर राहतात, पण ते चलनवाढीवर मात करणाऱ्या या गुंतवणूक प्रकाराला मुकतात. थेट बाजारात गुंतवणूक करून अशी जोखीम घेण्यापेक्षा म्युच्युअल फंडाची तुलनेने कमी असलेली जोखीम मात्र ते घेताना दिसत आहेत, जी अतिशय चांगली गोष्ट म्हटली पाहिजे.**

गेल्या आठवड्यातील शेअर बाजाराची चाल नव्याने आलेल्या गुंतवणुकदारांना निश्चितच घाबरवणारी होती. ५४ हजार ५०० वरून सेन्सेक्स गुरुवारी एकदम ५२ हजार ८०० वर आला होता. शुक्रवारी त्यात वाढ झाली आणि बाजार संपताना पुन्हा आपटी खाल्ली. जे घाबरले, त्यांनी शेअर विकून नुकसान पदरात पाडून घेतले आहे. जानेवारीच्या मध्यात ६१ हजार अंश पार करणारा सेन्सेक्स पुढील दोनच महिन्यांत म्हणजे ७ मार्चला सुमारे नऊ हजारांनी म्हणजे साडे बावन्न हजारांवर खाली आला होता. गेले काही दिवस तो एकाच दिवसात हजार, पंधराशे अंशांच्या गटांगळ्या किंवा तेवढीच तेजी दाखवीतो आहे. जे शेअर बाजाराला सरावलेले आहेत किंवा पट्टीचे गुंतवणूकदार आहेत, ते हा धक्का पचवू शकतात, कारण त्यांच्याकडे अधिक भांडवल असल्याने शेअर बाजार पडला की शांत बसायचे, हे त्यांना माहीत असते. पण जे नवीन असतात, ते ही पडझड सहन करू शकत नाहीत. नको ती शेअर बाजाराची वाट, असे ठरवून अनेक भारतीय गुंतवणूकदार नंतर शेअर बाजाराचे नाव घेत नाहीत. पण त्यामुळे, महागाईशी स्पर्धा करू शकणारा परतावा देणाऱ्या या गुंतवणुकीपासून ते दूर राहतात. शेअर बाजारातील गुंतवणूक इतर गुंतवणूक प्रकारांवर मात करते, असे म्हटले जाते आणि बहुतांश वेळा ते खरेच आहे, पण मग अशा गुंतवणूकदारांनी शेअर बाजारातील संपत्ती निर्माणाचा फायदा घ्यायचा नाही काय?

अर्थ प्रहर




यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

### इंडेक्स फंडांना मागणी

शेअर बाजाराच्या गुंतवणुकीचा मार्ग अनेकांसाठी अजूनही नवा आहे आणि त्याचा फायदा अधिकाधिक सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोचविण्याचा मार्ग म्हणजे म्युच्युअल फंड आहे. जगभर लोकप्रिय असलेला हा मार्ग आता भारतीय नागरिकही प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर वापरू लागले आहेत. भारताच्या लोकसंख्येची तुलना करता हे प्रमाण अजून खूपच कमी असले तरी गेल्या दोन–तीन वर्षांतील त्यातील वाढ अचंबित करणारी आहे. त्यातून हा गुंतवणूक प्रकार भारतातही वेगाने वाढत असल्याचे दिसून येते आहे. नुकतीच प्रसिद्ध झालेली आकडेवारी तरी तेच सांगते. विशेषत: इंडेक्स फंडमधील गुंतवणूक गेल्या काही महिन्यात वाढलेली दिसते आहे. ज्यात इंडेक्स वाढीचा फायदा मिळत राहतो. विशिष्ट कंपनी निवडा आणि तिच्यातील चढउताराला सामोरे जा, हा त्रास अशा फंडांमध्ये होत नाही. गेल्या एप्रिलमध्ये अशा फंडांत भारतीयांनी तब्बल १४००० कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. म्युच्युअल फंडांचे व्यवस्थापन करणाऱ्या भारतात तब्बल ४४ कंपन्या आहेत. मार्च २०२२ अखेर त्या तब्बल २० लाख कोटी रुपयांच्या फंडाचे व्यवस्थापन करतात. ज्या विदेशी गुंतवणूकदारांनी मार्च, एप्रिल आणि मेमध्येही भारतीय शेअर विक्रीचा सपाटा चालू ठेवला आहे, ते भारतीय बाजारातील सर्वांत मोठे गुंतवणूकदार आहेत. त्यांचा निधी ४७ लाख कोटींच्या घरात आहे. त्यांच्या विक्रीच्या माऱ्याने मार्च, एप्रिल, मेमध्ये बाजार अधूनमधून पडत राहिला, पण तरीही तो पुन्हा वर वर येत राहिला. याचे कारण म्युच्युअल फंडाच्या मार्गाने बाजारात गुंतवणूक करणारे भारतीय होय. कारण त्यांनी गुंतविलेले २० लाख कोटी रुपये म्हणजे विदेशी गुंतवणूकदारांनंतरची सर्वांत मोठी गुंतवणूक ठरली आहे. त्यामुळेच भारतीय शेअर बाजाराचे एकूण मूल्य या काळात आठ टक्क्यांनी खाली आले असताना म्युच्युअल फंडांच्या गुंतवणुकीने बाजाराला तारले आहे. बाजाराच्या मूल्यात या गुंतवणुकीचा वाटा आता तब्बल आठ टक्क्यांवर पोहचला आहे. गेल्या आर्थिक वर्षात तीन लाख कोटी रुपये या मार्गाने शेअर बाजारात आले, यावरून म्युच्युअल फंडांचे महत्त्व लक्षात येते. बाजार तुलनेने स्थिर राहण्यासाठी त्यात अशी खात्रीची भारतीय आणि संस्थात्मक गुंतवणूक वाढली पाहिजे. भारतीय बाजारात ती ११७ लाखकोटींवर पोहचली आहे, याचा अर्थ बाजारमूल्याच्या जवळपास निम्मी. विदेशी गुंतवणूकदारांनी विक्रीचा सपाटा लावूनही बाजार मोठ्या प्रमाणावर पडला नाही, याचे हे कारण आहे.

### म्युच्युअल फंडाचाच मार्ग योग्य का?

बाजारात जेव्हा तेजी असते आणि आपण किती कमी दिवसांत किती जास्त पैसे कमावले, असे आपल्या आजूबाजूचे लोक सांगू लागतात किंवा बाजारातील कमाईविषयीचे लेख प्रसिद्ध होऊ लागतात तेव्हा अशा कमाईचे आकर्षण वाटणे, हे अगदी साहजिक आहे. पण तुम्ही जर आतापर्यंत शेअर बाजारात गुंतवणूक करण्याचा अनुभव घेतला नसेल, तर त्याने अशा उच्चांकावर बाजार असताना थेट बाजारात कधीही गुंतवणूक करू नये. त्यामुळे अशा सर्वांनी आणि नव्याने शेअर बाजारातील गुंतवणुकीचा फायदा घेऊ इच्छीणाऱ्यांनी म्युच्युअल फंडाचाच मार्ग निवडला पाहिजे. याची पुढील काही कारणे आहेत.




१. थेट शेअर्समध्ये गुंतवणूक करण्यासाठी मोठी रक्कम लागते, मात्र म्युच्युअल फंडांत ५०० रुपयांनीही सुरवात करता येते.

२. बाजारात पाच हजारांवर कंपन्या आहेत. त्यातील कोणत्या कंपन्यांत गुंतवणूक करावी, हे वैयक्तिक गुंतवणूकदार पुरेशा अभ्यासाअभावी ठरवू शकत नाहीत. म्युच्युअल फंडचे व्यवस्थापक पूर्णवेळ त्याचाच अभ्यास करत असतात. त्यामुळे शेअर बाजार पडतो, तेव्हा नुकसान मर्यादित होते.

३. शेअर बाजार ही अधिक जोखीम असलेली गुंतवणूक आहे. जगातील अनेक घटनांचा त्यावर परिणाम होऊन बाजारात चढउतार होतातच. असे मोठे चढउतार सहन करण्याची नव्या गुंतवणूकदारांची तयारी नसते. त्यामुळे त्यांना मानसिक त्रास होतो. बहुतांश म्युच्युअल फंड हे शेअर बाजाराशीच संबंधित असतात, पण हे चढउतार म्युच्युअल फंडात तेवढे धक्कादायक नसतात.

४. दीर्घकालीन गुंतवणुकीचा संकल्प नव्या गुंतवणूकदारांनी केलेला असतो तरी ते बाजारातील चढउताराला घाबरून शेअर्सची खरेदी विक्री अधिक करतात. त्यामध्ये ब्रोकरेज, एसटीटी, असे कर जात असतात. म्युच्युअल फंडांची खरेदी–विक्री करताना एवढे कर लागत नाहीत.

५. शेअर बाजारातील थेट गुंतवणूक ही लिस्टेड कंपन्यांमध्येच किंवा इंडेक्समध्येच केली जाऊ शकते, मात्र म्युच्युअल फंडाच्या मार्गाने डेट, सोने, रियल इस्टेट अशा संपत्तीच्या इतर प्रकारातही गुंतवणूक करता येते.

६. थेट गुंतवणुकीसाठी विशिष्ट कंपन्या निवडल्या आणि त्यांचे शेअर घेतले, तर त्यातील काही कंपन्यांचे भाव खूप खाली येवू शकतात, मात्र म्युच्युअल फंड व्यवस्थापक विशिष्ट कंपनीत जास्तीत जास्त (उदा. १० टक्के) गुंतवणूक करू शकतात. याविषयी सेबीचे नियम अतिशय कडक असल्याने गुंतवणूकदार अशावेळी सुरक्षित राहतात.

७. शेअर बाजारातील थेट गुंतवणुकीतून झालेल्या नफ्यावर कर द्यावा लागतो, तेवढा कर म्युच्युअल फंडातून झालेल्या नफ्याला द्यावा लागत नाही.

८. थेट गुंतवणुकीत आपल्याकडील शेअरच्या किमतीतील चढउतारामुळे अस्वस्थता येवू शकते, पण म्युच्युअल फंड गुंतवणूक कोणत्या कंपन्यांत आहे. याच्याशी आपला थेट संबंध नसतो. त्यामुळे या चढउतारांचा थेट त्रास होत नाही.

९. बाजारातील चढउतारांवर लक्ष ठेवून शेअर विकत घेणे किंवा योग्य वेळी त्यांची विक्री करणे, हे भल्याभल्यांना शक्य होत नाही. म्युच्युअल फंडात गुंतवणूक करताना मात्र आपण आपल्या सोयीने हे व्यवहार करू शकतो. हे व्यवहार आता ॲपवरही होऊ शकतात.

१०. रिटायरमेंट फंड, चिल्ड्रेन फंड तसेच टॅक्स सेवर असेही फंड असल्याने त्या त्या उद्देश्यासाठी गुंतवणूक करण्याची संधी म्युच्युअल फंड देतात, पण थेट शेअर घेताना असे उद्देश्य पूर्ण होतीलच, असे खात्रीने म्हणता येत नाही. कारण थेट खरेदी–विक्रीमध्ये जोखीम वाढते. कोरोनाच्या काळात अचानक कोसळलेला बाजार आणि आता युद्ध, महागाई आणि रिझर्व बँक, अमेरीकन फेडने व्याज दरवाढीचा घेतलेला निर्णय, अशा कारणांनी शेअर बाजार अस्थिरच राहणार आहे. या चढउताराची सवय झाली की बाजार खाली आल्यावर आपल्या म्युच्युअल फंडातील गुंतवणूक वाढविली की परतावा वाढतो, जो थेट शेअरच्या थेट खरेदी विक्रीतून मिळणाऱ्या परताव्याशी स्पर्धा करू शकतो.

### दीर्घकालीन गुंतवणूक हवी

अर्थात, एक गोष्ट येथे स्पष्ट केली पाहिजे, ती म्हणजे थेट शेअर खरेदी केल्यामुळे कंपन्यांचा मिळणारा डिव्हीडंड, बोनस शेअर, मतदानाचा अधिकार तसेच चांगल्या कंपन्यांच्या शेअरमध्ये होणाऱ्या वाढीचा फायदा मिळतो. तो म्युच्युअल फंड गुंतवणुकीत मिळत नाही, पण हे सर्व फायदे मिळविण्यासाठी शेअर बाजाराचा अभ्यास असायला हवा. असा अभ्यास असणाऱ्या गुंतवणूकदारांनाही अनेकदा मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागतो, पण त्यांच्याकडे भांडवलाची कमी नसल्याने ते त्यातून मार्ग काढतात. सर्वसामान्य गुंतवणूकदार मात्र त्या नुकसानीतून बाहेर येऊ शकत नाहीत. त्यामुळे ज्यांची जोखीम पेलण्याची क्षमता आहे त्यांनी शेअर बाजारात थेट गुंतवणूक करावी, मात्र ज्यांची सुरुवात आहे, त्यांनी एसआयपीच्या मार्गाने आणि बाजार खाली आल्यावर लमसम रक्कम म्युच्युअल फंडात गुंतवावी, हे चांगले. अर्थात, त्यासाठी पाच–दहा वर्षे तरी गुंतवणूक करत रहावी लागते, हे लक्षात ठेवले पाहिजे.

---

# व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग : प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्याचे धाडस करणार?

**तापलेला बाजार शांत होतो आहे, याचा अर्थबाजार पुन्हा व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग करण्याची संधी देतो आहे. त्यामुळे आता चांगल्या कंपन्या म्हणजे ज्यांचे मूल्य कमी आहे, अशा कंपन्यांच्या शेअरची आता खरेदी केली पाहिजे. ज्यांना बाजारात दीर्घकालीन गुंतवणूक करावयाची आहे, त्यांच्यासाठी असा काळ उत्तम मानला जातो. अर्थात त्यासाठी प्रवाहाच्या विरोधात पोहण्याचे धाडस करावे लागेल.**




व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग हा शब्द आपण बऱ्याच वेळा ऐकतो, वाचतो परंतु अनेक जणांना खरोखरीचं व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग म्हणजे काय व ते कसं होतं याबद्दल बहुधा माहिती नसते. तर व्हॅल्यू म्हणजेच किंमत किंवा मूल्य हा शब्द लॅटीन भाषेपासून आलाय. लॅटीन भाषेतील मूळ शब्द आहे व्हॅलेर (valere) म्हणजे इंग्लिशमध्ये 'Be worth' म्हणजेच पात्रतेचा अथवा योग्यतेचा. आपल्या बोली भाषेत योग्य मूल्याचा. उदा. जर एखादा शेअर आपण हजार रुपयांना घेत आहोत तर त्याचं मूल्य हजार रुपये आहे का? जर ते हजारापेक्षा जास्त असेल तर तो शेअर नक्कीच अंडर व्हॅल्यूड असू शकतो म्हणजेच तो शेअर खरेदी करणं हे व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग ठरू शकतं.

जेव्हा मॉलमध्ये सेल लागतात, कोणतीही गोष्ट डिस्काउंटमध्ये मिळते तेव्हा काहींना कोण आनंद होतो व लागलीच खरेदी होते. परंतु हीच गोष्ट जर शेअर बाजाराच्या बाबतीत झाली तर आपण लगेच आपण सावध होतो व खरेदी लांबणीवर टाकतो. समजा एखाद्या कंपनीच्या शेअरचा भाव ११०० रुपयांवरून १० टक्के पडून म्हणजेच ९९० रुपयांवर आला तर ११०० रुपयांना खरेदी करण्यास मागं पुढं न पाहणारा गुंतवणूकदार थबकतो व अजून भाव खाली जायची वाट पाहू लागतो मग प्रश्न असा पडतो की, ११०० रुपयांवर त्या शेअरचं मूल्य ११०० रुपयांपेक्षा कमी होतं का? जर याचं उत्तर नकारार्थी आलं तर मग आता तोच शेअर ९९० रुपयांस खरेदी करताना का विचार करावा लागतोय. मग खरोखरीच त्या शेअरचं मूल्य काय ?



प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

जर खरोखरीच त्या शेअरचं मूल्य ११०० रुपयांपेक्षा जास्त असल्यास व जर तोच शेअर ९९० रुपयांवर आल्यास तो खरोखरीच व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग ठरू शकेल. तर असं हे व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग करायचं कसं ? याची सरळ सोपी व्याख्या म्हणजे, जास्त 'मूल्य' असलेल्या (भाव नाही) कंपनीचा शेअर कमी त्या मूल्याच्या कमी भावात खरेदी करणं. अशा वेळी नक्कीच तुम्हाला प्रवाहाच्या विरोधात पोहावं लागतं कारण भाव पडल्यावर (घाबरून) शेअर्स विकणारे बरेच असतात, परंतु ज्यांना चांगल्या कंपन्या माहीत आहेत त्यांचे शेअर्स पडत्या भावात खरेदी करणं ही उत्तम संधी असते व यालाच गोंडस शब्द आहे व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग. याचा अजून एक फायदा आहे तो म्हणजे अशावेळी नुकसानीची शक्यता तुलनात्मकदृष्ट्या कमी असते. मागील वर्ष हे आयटी, फार्मा, केमिकल्स, मेटल्स या कंपन्यांच्या शेअर्सनी गाजवलं होतं आणि आज तेच शेअर्स त्यांच्या उच्चांकापासून २०–५० टक्क्यांपर्यंत खाली आलेले दिसत आहेत. याची उत्तम उदाहरणं म्हणजे डीमार्ट ५९००–३३००, डॉरेडडी ५६००–३९००, जुबिलंट फूड्स ९००–४५०.

शेअरच्या किंमती या त्यांच्या कंपन्यांच्या मिळकतीच्या आधीन असतात असं बाजारात म्हटलं जातं, परंतु तेवढ्याच त्या भावनेच्या देखील आहारी असतात. यातील पाहिलं वाक्य खरं मानलं तर सध्या काही मोजकी एकदोन क्षेत्रं वगळता, सर्वच क्षेत्रातील बहुसंख्य कंपन्यांच्या शेअर्सनी निराशाजनक कामगिरी केलेली दिसून येते आणि म्हणूनच पहिलं विधान आपल्याला संभ्रमात टाकतं आणि दुसरं विधान खरं ठरताना दिसतंय.

शेअर बाजारात गुंतवणुकीचे दोन पर्याय असतात, एक अल्प मुदतीसाठी म्हणजे एक दिवस ते काही महिने, ज्यामध्ये आपल्या लावलेल्या मुद्दलावर ठराविक टक्के परतावा मिळाला की त्यातून बाहेर पडायचं, यालाच काही लोक ट्रेडिंगदेखील म्हणतात. तर, दुसरा पर्याय म्हणजे दीर्घकालीन गुंतवणूक, ज्यामध्ये ठराविक परतावा मिळाला तरी दीर्घकालावधीसाठी ती गुंतवणूक सांभाळून ठेवणं, जसं आपण बँकेतील मुदतठेवीसोबत करतो, मात्र अनेकदा बरेच गुंतवणूकदार याच्या अगदी उलट करताना दिसतात, म्हणजे ट्रेडिंगसाठी घेतलेल्या शेअर्सचे भाव खाली आले तर लॉस होईल म्हणून दीर्घ कालावधीसाठी सांभाळत बसतात व त्यांचा भाव कधीही येत नाही आणि दीर्घकालावधीसाठी म्हणजेच संपत्तीनिर्मितीसाठी घेतलेले शेअर्स थोडासा नफा मिळत असल्यास लगेच विकून टाकतात आणि सध्याच्या बाजारात अजून एक प्रकार पाहायला मिळतोय तो म्हणजे दीर्घकालावधीसाठी घेतलेले शेअर्स भाव घसरले म्हणून विकण्याची घाई.

अनेकदा म्हटलं जातं की, शेअर बाजारातील गुंतवणूक ही दीर्घकालीन असावी परंतु याचा खरा अर्थ फारच कमी जणांना उमजतो. म्हणजे, उत्तम कंपन्यांच्या शेअर्समध्ये केलेली गुंतवणूक ही प्रदीर्घ काळात उत्तम नफा मिळवून देते म्हणजे जर घेतलेले शेअर्स प्रदीर्घ कालावधीपर्यंत सांभाळले तर! परंतु असे शेअर्स घेताना त्या कंपन्यांचा सर्वतोपरी विचार करून त्यांची खरेदी योग्य भावात केलेली असली पाहिजे. कारण, उत्तम भावात एखाद्या ठीकठाक कंपनीचे शेअर्स घेण्यापेक्षा ठीकठाक भावात एखाद्या उत्तम कंपनीचे शेअर्स विकत घेणे केव्हाही चांगले. कंपनीची निवड अचूक असल्यास त्या कंपनीचे शेअर्स दीर्घ कालावधीत उत्तम नफा पदरात पडून देऊ शकते. मागील काही लेखांमध्ये सुचवल्याप्रमाणे अडानी ग्रीन (६५), सीडीएसएल (४६३), पॉलीकॅब (८५०), एशियन पेंट्स (१७९०), टाटा मोटर्स (२६०) (कंसात खरेदीस सुचवलेला भाव) हे शेअर्स आजही अनेकपट परतावा देताना दिसत आहेत.

अगदी ढोबळमानानं जरी बाजारात गुंतवणूक करायची ठरवल्यास बाजाराचं किंमत/उत्पन्न गुणोत्तर मार्गदर्शक ठरू शकतं. बाजार पडण्याआधी म्हणजे फेब्रुवारी मध्ये निफ्टी५० चा प्राईस टू अर्निंग्स रेशयो २५ होता व आता तो २०च्या आत आहे. याचा अर्थ म्हणजे निफ्टी५० मधील सर्व कंपन्यांचा एकत्रित विचार केल्यास, एक रुपया कमावण्यासाठी आपण २० रुपये मोजतोय. सर्वसाधारणपणे २५–३०च्या दरम्यानचा पीई म्हणजे बाजार महाग गृहीत धरला जातो व जसजसा तो २०च्या आत येऊ लागतो तसतसा गुंतवणुकीसाठी अनुकूल. कोणत्याही परिस्थितीत आपली गुंतवणुकीबाबतची शिस्त पाळल्यास दीर्घावधीत त्याची उत्तम फळं मिळतात हे बाजार नेहमीच शिकवत आलाय, गरज आहे आपण विश्वास दाखवण्याची.

---

## अर्थसाक्षर स्पर्धा : २०

### निकाल पुढीलप्रमाणे

**प्रश्न क्र. १. भारतातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या असलेल्या एलआयसीच्या आयपीओद्वारे सरकारला किती रक्कम मिळणार आहे?**
***अ.*** २१ हजार कोटी रुपये

**प्रश्न क्र. २. १०० अब्ज डॉलर इतक्या वार्षिक महसुलाच टप्पा गाठणारी पहिली भारतीय कंपनी कोणती?**
***ई.*** रिलायन्स इंडस्ट्रीज

**प्रश्न क्र. ३. मे च्या पहिल्या आठवड्यातील बाजारमूल्यानुसार देशातील वीज क्षेत्रातील सर्वात मोठी सरकारी कंपनी कोणती?**
***आ.*** पॉवर ग्रीड

**अर्थसाक्षर स्पर्धा २०च्या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा २०साठी एकही विजेता नाही.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २१

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पाम तेलाची जगाला सर्वाधिक निर्यात करणारा देश कोणता?**
***अ.*** इंडोनेशिया ***आ.*** मलेशिया ***इ.*** नेदरलँड्स ***ई.*** ग्वाटेमाला

**२. एका आर्थिक वर्षात बँकेतून इतकी रोख रक्कम काढल्यास किंवा बँकेत भरल्यास येत्या २६मेपासून पॅनकार्ड किंवा आधारकार्ड नोंदविणे बंधनकारक करण्यात आले आहे?**
***अ.*** १० लाख रुपये ***आ.*** २० लाख रुपये ***इ.*** २५ लाख रुपये ***ई.*** पाच लाख रुपये

**३. देशातील बँकांचे व्याजदर पुढीलपैकी कोणती संस्था ठरविते?**
***अ.*** केंद्र सरकार ***आ.*** राज्य सरकार ***इ.*** रिझर्व बँक ***ई.*** सेबी

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई–स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# आगरदांडा ते नांदले रस्ता तातडीने तयार करा

## नांदले ग्रामस्थांनी दिला ‘रास्ता रोको’ करण्याचा इशारा

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील आगरदांडा ते नांदले गावातील रस्ता गेले अनेक वर्षे खड्डेमय व नादुरुस्त झाला असून त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. हा रस्ता त्वरित दुरूस्त करावा, अन्यथा शुक्रवारी (दि. २०) रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा नांदले ग्रामस्थांनी मुरूड सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदनाद्वारे दिला आहे.

पुर्वी आगरदांडा ते नांदले या रस्त्याने वाहतूक होत होती, मात्र दिघी पोर्टसाठी डोंगर पोखरून आगरदांडा ते इंदापूर रस्ता सिमेंट काँक्रिटचा बनवण्यात आला. तो जवळचा पडत असल्यामुळे मोठंमोठी वाहने व बहुतांशी वाहतूक या नवीन रस्त्याने सुरु आहे. त्यामुळे जुन्या नांदले मार्गे रस्त्यावरील वाहतूक कमी झाली. या रस्त्यावरून सध्या एसटी वाहतूक होते. परिणामी या रस्त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाल्याने हा रस्ता खड्डेमय झाला आहे. आगरदांडा ते नांदले रस्ता नादुरुस्त असल्याने दुचाकी व चारचाकी वाहनांना मोठा त्रास सहन करावा लागत असून या रस्त्यावरील अपघाताचे प्रमाणसुद्धा वाढले आहे.

आगरदांडा ते नांदले रस्ता दुरुस्त करावा, यासाठी नांदले ग्रामस्थांनी १७ फेब्रुवारी रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुरूड कार्यालयाला निवेदन दिले होते. मात्र त्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने अखेर नांदले ग्रामस्थांनी २० मे रोजी भालगाव मार्गे रोहा या मार्गावर ‘रास्ता रोको’ करण्याचा इशारा दिला आहे.

पंचक्रोशी कुणबी समाज अध्यक्ष संतोष पाटील, उपाध्यक्ष रामा आरकर, सचिव सचिन पाटील, हरिश्चंद्र शिवणे, सुरेश पाटील, कृष्णा माळी आदींनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुरूड कार्यालयाला दिलेल्या या निवेदनाच्या प्रती मुरूड तहसीलदार व पोलीस ठाण्यालाही देण्यात आल्या आहेत.



# मुरूडमध्ये पाच ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुका जाहीर

**मुरुड : प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार राज्यातील ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणूकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. रायगड जिल्ह्यात १२३ ग्रामपंचायतींमधील १७२ जागांसाठी पोटनिवडणूक होत असून त्यात मुरूड तालुक्यातील वावडुंगी, सावली, राजपूरी, एकदरा व चोरढे पाच ग्रामपंचायतीत रिक्त असलेल्या १५ पदांसाठी ५ जून २०२२ रोजी मतदान घेण्यात येणार आहे.

मुरूड तालुक्यातील वावडुंगी, सावली आणि चोरढे या ग्रामपंचायतीमधील प्रत्येकी एक, राजपूरीमधील चार आणि एकदरा ग्रामपंचायतीमधील आठ मिळून ग्रामपंचायत सदस्य पदच्या एकूण १५ जागा रिक्त आहेत. वावडुंगी ग्रामपंचायतीमधील एक जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. एकदरा ग्रामपंचायतीमधील अनुसूचित जमातीच्या सर्व सदस्यांचे जातीचे दाखले अवैध ठरल्याने त्यांचे सभासदत्व रद्द झाले आहे. त्यामुळे येथील आठ जागांसाठी पोटनिवडणूक लागली आहे.

**पोटनिवडणुकीचा कार्यक्रम**

नामनिर्देशनपत्रे सादर करणे : १३ ते २० मे
छाननी : २३मे सकाळी ११ वाजल्यापासून
नामनिर्देशन पत्र मागे घेणे : २५ मे दुपारी ३ वाजेपर्यंत,
निवडणूक चिन्ह वाटप : २५ मे दुपारी ३ नंतर
मतदान : ५ जून २०२२
मतमोजणी व निकाल : ६जून २०२२

# उन्हाची काहिली अन् पाण्याच्या दुर्भिक्षामुळे रोपवाटिकांची होरपळ

## रोपे वाचविण्यासाठी धडपड, विक्री घटली

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील तापमानात दिवसागणिक वाढ होत आहे. शिवाय पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. यामुळे येथील रोपवाटिकांची (नर्सरी) होरपळ होत आहे. रोपे वाचविण्यासाठी धडपड सुरू आहे. शिवाय विक्रीदेखील घटली आहे. परिणामी नुकसान होत असल्याने रोपवाटिकाधारक चिंतेत आहेत.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी रोपवाटिका व्यवसाय चांगला बहरला आहे. येथून वर्षाला काही कोटींचा व्यवसाय होतो. आपल्या शेतात, फळ, फुल बागांत आणि परसबागेत लावण्यासाठी अनेक जण या रोपवाटिकांमधून रोपे व लॉन खरेदी करतात. मात्र सध्या रायगड जिल्ह्यात पाण्याचे दुर्भिक्ष आहे. तलाव, कूपनलिका, नैसर्गिक व कृत्रिम पाणीसाठे संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहेत. परिणामी आपल्या रोपवाटीकेतील रोपांना पाणी उपलब्ध करून देतांना रोपवाटिकाधारकांची खूप धावपळ होत आहे. प्रचंड उष्मा व पाण्याच्या कमतरतेमुळे रोपे कोमेजून गेली आहेत.

पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. पावसाळ्याच्या सुरूवातीला शेतकरी, बागायतदार आणि निसर्गप्रेमी यांची रोपे खरेदीसाठी लगबग सुरू होते. त्यामुळे रोपवाटिकाधारकांना चांगला व्यवसाय असतो. फळ आणि फुल झाडांना खुप मागणी असते. सध्या वाढत्या उष्म्यात रोपांना जगविणे खूप अवघड झाले आहे. काही रोपवाटिकाधारक आपल्या रोपवाटिकेत पाण्याची व्यवस्था करतात मात्र वाढत्या गर्मीमुळे झाडांना अधिक पाणी लागते. काही वेळेला टँकरने विकतचे पाणी आणावे लागते.





मुबलक पाणी मिळाले नाहीतर रोपे कोमेजतात किंवा मरतात. त्यामुळे रोपवाटीकाधारकांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. काही वेळेला अधिकचे पाणी देण्यासाठी व झाडांची निगा राखण्यासाठी मनुष्यबळ वाढवावे लागते. रोपांवर ग्रीननेट किंवा कापडी छत लावावे लागते. अशा प्रकारे रोपांच्या देखभालीसाठी अधिक पैसे व श्रमदेखील द्यावे लागते. त्यामुळे हा व्यवसाय आता खूप मोठ्या संकटात सापडला आहे. नैसर्गिक वातावरणातील बदलात व्यवसाय टिकवणे रोपवाटिकाधारकांपुढे मोठे आव्हान होऊन बसले आहे.

**पाण्याची कमतरता व वाढती गर्मी यामुळे रोपे जगविणे व टिकविणे खूप अवघड होत आहे. अशा कारणांनी उन्हाळ्यात जास्त नवीन माल आणत नाही. पाणी जास्त लागल्यामुळे वेळ आणि खर्च अधिक होतो. कोरोनामुळे मागील दोन वर्षे व्यवसाय ठप्प होता. आणि आता वाढत्या उष्म्याने पुन्हा प्रतिकूल परिणाम झाला आहे.**

**–अमित निंबाळकर, मालक, ग्रीनटच नर्सरी, पाली**

### रोपे आणि विक्रीवर परिणाम

**वाढत्या उष्म्यामुळे रोपांना पाणी जास्त लागते. खुप पाणी देऊनही रोपे ताजी वाटत नाहीत. त्यामुळे मरगळलेल्या आणि मलूल झालेल्या रोपांची विक्री होत नाही. कमी पाण्यामुळे व वाढत्या गर्मीमुळे रोपांची वाढ खुंटते. बरीच रोपे ही प्लास्टिक पिशवीत असल्यामुळे रोपे पाणी लगेच खेचतात आणि ऊन असल्याने पिशवी लवकर सुकते. परिणामी या सर्व कारणांमुळे रोपवाटिकाधारकांना मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागत आहे.**

# चेकद्वारे फिर्यादीच्या खात्यामधून १८ लाख रक्कम काढून फसवणूक

**पेण : प्रतिनिधी**

फिर्यादी गणेश म्हात्रे (रा. वडखळ, ता. पेण) यांचे पाटणेश्वर अर्बन बँकेमध्ये ओव्हरड्राफ्ट अकाउंट आहे. अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे पाटणेश्वर बँकेचे चेक प्राप्त करून त्यावर फिर्यादी यांची खोटी सही केली व ते राजन महादेव म्हात्रे (रा. उचेडे, ता पेण) यांच्या कागदपत्रांचा गैरवापर करून बँक ऑफ इंडियाच्या पेण शाखेत उघडलेल्या खात्यात १ जानेवारी २०१६ ते डिसेंबर २०२१ या पाच वर्षाच्या कालावधीत जमा केले. या खात्यात चेकव्दारे जमा केलेले एकूण १८ लाख १८ हजार ५०० जानेवारी २०१६ पासून नोव्हेंबर २०२१ पर्यंत स्वतःच्या फायद्याकरीता काढून घेऊन अज्ञात इसमाने फिर्यादी यांची फसवणूक केली.

याबाबत गणेश म्हात्रे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक निरीक्षक प्रसाद ढेबे करीत आहेत.

# प्रवासादरम्यान महिलेचे दोन लाखांचे दागिने लंपास

**पेण : प्रतिनिधी**

पाली खुर्द चौक येथून पेण असा प्रवास करीत असताना फिर्यादी यांच्या बॅगेतील दोन लाख ७९ हजार रुपयांचे दागिने अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली आहे.

फिर्यादी संचिता सचिन पाटील (रा. सापोली, ता. पेण) या त्यांच्या मामेभावाच्या इनोव्हा गाडीतून पाली खुर्दे चौक ते पेण बायपास असा प्रवास करीत होत्या. त्यांनी त्यांची बॅग पाठीमागच्या सिटवर ठेवली होती. या बॅगेजवळ बसलेल्या आरोपीने फिर्यादी यांची नजर चुकवून बॅगमधील एकूण दोन लाख ७९ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

याबाबत संचिता पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपनिरीक्षक प्रतिक पोकळे करीत आहेत.

**MISSING CAT - REWARD Rs 5000**

बिल्ली का नाम – मौव
लिंग – महिला, रंग और शरीर – सफेद रंग काले भूरे रंग के पैच के साथ मोटी और बहुत अनुकूल मादा बिल्ली
निशान – उसका बायां कान थोड़ा कटा हुआ
कॉलर टैग – उसकी गर्दन पर गुलाबी रंग की बेल्ट और नीले रंग का टैग उसके नाम और संपर्क नंबर के साथ लिखा है
अंतिम बार देखा गया – ६ मई २०२२
पारिवारिक संपर्क नंबर – जयराम – ९१६७३५९१८८ और ९९६७३०३२८८
कृपया मदद खोजने में RS 5000 इनाम दिया जाएगा





**REQUIRED TEACHER**

PLEASANT ENGLISH SCHOOL
SANGDE
At - SANGADE, POST-CHIKHALE,
Tal - PANVEL, Dist - Raigad

**Qualification**

1) B. Sc. B. ED.
2) M. A. - English
3) B. ED.
4) B. P. ED.

**CONTACT NO. : 8369297031, 9767 41 9018.**
**sd/-**
**HEAD MASTER**
**Pleasant English School**
**Pre-Primary & Primary School**

**आवश्यकता आहे – शिक्षिका**

पिपल्स अँड पॅरेंट्स असोशिएशन संचालित. मायनॉरिटी इंग्लिश स्कूल पनवेल.
१). शिक्षिका – B.A, B.ED, D.ED (Specially English sub)
२). शिक्षिका – B.A, B.ED, D.ED (Hindi and Marathi sub)
३). शिक्षिका – कला व हस्त कला विषय.
४). B.COM, B.A, COMPUTER
(FOR COMPUTER TEACHER)
फक्त महिला संपर्क करू शकतात तसेच अनुभवास प्राधान्य. वरील अर्हताधारण केलेल्या उमेदवारांनी लवकरात लवकर खालील पत्त्यांवर अर्ज करावा.

पत्ता :– पनवेल महानगर पालिका जवळ प्लॉट नं ४५, मायनॉरिटी इंग्लिश स्कूल पनवेल.
संपर्क :–९९६७८६७९८०, ९८२०९०८००७

**सही/–**
**मुख्याध्यापिका**
**मायनॉरीटी इंग्लिश स्कूल**
**पनवेल**


# कोकणातील पारंपरिक भातशेती



कोकणात भातशेती ही आजही पारंपरिक पद्धतीने केली जाते. कोंकणी माणसाच्या जगण्यातला तो एक अविभाज्य भाग आहे. वरकस कातळी जमिनीत आणि पाणथळ जमिनीवर केल्या जाणाऱ्या शेतीला चोंडा असे म्हणतात. रांगेत दहा चोंडे असल्यास त्याच्या मध्यवर्ती भागातील एका चोंड्याची निवड पेरणीसाठी म्हणून केली जाते. त्यांत बियाणे पेरा करण्यापूर्वी चोंड्याची नीट मशागत केली जाते. पालापाचोळा, इतर रानवटी काडी–डोंगळा–काटेरी झुडपं तसेंच सुकलेले शेण, त्याचे लाल मातीत मिश्रण करून अशा वस्तुंचे थर लावून व्यवस्थित गादी तयार केली जाते. यास कोकणात कौल तोडणी असे म्हणतात. दोन दिवसांच्या कडक ऊन्हात ते वाळल्यावर सायंकाळी उन्ह उतरल्यावर त्यास पेटवून दिले जाते. शेणपूरे, लाल मातीचा मिश्र सुगंधित धूर सर्वत्र पसरला जातो. या प्रकियेस 'भाजावण' असे म्हणतात.

चोंडा, कौल, भाजावण, साकुल, लावणी, भारा, उडवी, मळणी, हडपा इत्यादी गोंडस नावे कोकणातील शेतकऱ्यांना कशी अवगत झाली? याचे उत्तर मिळणे कठीण असले तरी त्यांस परंपरेची सुरेख झालर असावी, इतकं मात्र खरं!

पुढे भाजावण केलेल्या चोंड्याची साकुल काढणी सुरू होते. साधारणपणे दोन ते तीन तासात हे काम पूर्ण होते. साकुल म्हणजेच भाजक्या जमिनीतील काटाकुटा, दगड–धोंडा, इतर काही अपायकारक चीजवस्तू जळायची राहून गेली असल्यास निगडीच्या टणक लांबसडक काठ्यांची सापडी (झाडू) तयार करून त्याने चोंडा नीट झाडून घेतला जातो. जेणे करून पेरा करण्यापूर्वी चोंडा निर्जंतुक व्हावा, त्याची साफसफाई व्हावी. त्यांतील कीड–मुंगी, वाळवी इत्यादीपासून जमीन मुक्त होताच सुमारे रोहिणी नक्षत्र आरंभ होईपर्यंत, आकाशी ढगांची जमवाजमव कितपत सुरू झाली आहे? याचा अंदाज घेऊनच शेतकऱ्याकडून भात बियाण्याचा पेरा केला जातो. हे सर्व अनुभवावर अवलंबून असते.



पूर्वी भातशेती म्हणजे वार्षिक कृषिउद्योग समजला जायचा. ती जाणीव मात्र आता काहीशी कमी होऊ लागली आहे. जगण्याची उमेद घेऊन जबाबदारीने केलेली मातीची मशागत म्हणजेच, जगण्याचा एक मार्ग, हे सत्य जीवनात आवश्यक असे मानले जाऊन पूर्वी भातशेती केली जात असे.

साकुल काढणं



हा एक योग्य मार्ग समजला जातो. कारण नांगरी स्वतः तसेच बैलांच्या पायांत काटा रूतू नये, लांबट दगड किंवा लाकडी सुळा येऊ नये याची खबरदारी घेणे म्हणजेच साकुल काढणे होय. जेणेकरून नांगरकीच्या कालावधीत शारीरिक फिटनेसकडे जास्त लक्ष दिले जाते.

स्वतः नांगरी तसेच त्याचे बैल दोघेही सशक्त असतील तरच भरपावसात चिखल मातीत नांगरकी करू शकतील.

जर शेती पाणथळ असेल तर आवण (भात रोप) नीट आकार घेईपर्यंत त्यांस पाणीपुरवठा केला जाऊ शकतो. पण वरकस जमिनीतल्या चोंड्याची मात्र तशी निगा राखणे फारच कठिण असते. शेतकरी अशा अवस्थेत हवालदिल होतो. आकाशी पाणी वेळेवर न पडल्यास पुढे पीक घेईपर्यंत शेतकरी चिंतीत राहणे सहाजिकच आहे. काही वेळा नको तेव्हां अतिवृष्टीमुळेसुद्धा भातशेती कमकुवत ठरू शकते. अशा वेळी रोपे जगतात खरे पण भात–दाण्याची लोंब भरीव नसते. पदरी फक्त पेंढा येतो, जो गुरांना खायला उपयोगी ठरतो. पूर्ण मेहनत वाया जाते. योग्य वेळी पाऊस बरसला की भातशेती सोनं पिकवून देऊ शकते, अन्यथा पदरी पूज्य, हे वेगळं सांगणे नको.

कोकणातील भातशेती पूर्वी डालेकरी पद्धतीने व्हायची. दोन, तीन शेतकरी कुटूंबे मिळून कुटूंबातील सर्व सदस्य आलटून–पालटून एकमेकांच्या मदतीने शेतात भात लावणीचे काम केले जात असे. त्यामुळे घरांत दाणा येईपर्यंत जे श्रम घेतले जायचे त्याचे फलित साध्य व्हायचे. 'साथी हाथ बढाना साथी रे...' या तत्वावर! पुढे कौटूंबिक पद्धतीत बरेच बदल येऊ लागले. आणि शेतकरी असंघटीतपणे कसाबसा जगू लागला. व कालांतराने शेती दुर्लक्षित होऊ लागली. तांदूळ, नाचणी ही पारंपारिक अन्नधान्ये आज दुकानातून आणावी लागत आहेत.

लावणीनंतर कापणी आणि तद्नंतर मळणी. हे टप्पे उत्तरार्धातील प्रक्रिया होत. भातशेतीची ही पारंपरिक पद्धत आज जवळपास मंदावत चालली आहे. कारणं अनेक असतील पण मुळातच निसर्गाचे कालचक्र आता फारच वेगळ्या दिशेने संक्रमित होत आहे. निसर्गापुढे सारेच हतबल झाले आहेत. शिवाय अलिकडे आजचा तरुण शहरी नोकरीत जास्त रमू लागला आहे.

अलीकडच्या काळात रासायनिक खते अमाप येऊ लागलीत, त्याचा उपयोगही प्रमाणाबाहेर होऊ लागला आहे. तुडतुडा व इतर कीटकांपासून पीक वाचवण्यासाठी म्हणून विविध रासायनिक फवारण्या केल्या जात आहेत. शिवाय बैलांच्याऐवजी काही शेतकरी इंधनावर चालणारे टिलर मशीन नांगरकीसाठी वापरत आहेत. त्यामुळे नफा नुकसान असे गणिती विचार चघळले जाऊ लागलेत. तसं होऊ नये असं नव्हे, पण आज इंधन ही जागतिक समस्या बनली आहे हे सर्वश्रुत आहे. तर कमी श्रमात टिलरने शेत चोंडे नांगरून होत असतील तर त्यांस लागणारे इंधन शेतकऱ्यांना परवडेल का? हा प्रमुख मुद्दा होय.

अनेकांनी भातशेती सोडली आहे. कारण आमदनी आठन्नी , खर्चा रुपय्या! ज्यांना ती जमते त्यांनी आपला हा मार्ग पारंपरिक असावा, याकडे जास्त लक्ष दिले आहे. रासायनिक खताच्या वापरावर कायम अंकुश असावा. रासायनिक खतामुळे माणूस किती त्रस्त झाला आहे, हे सर्वज्ञात आहे. भातशेती हा कालांतराने लघु उद्योग होईल पण त्याची काही पथ्ये आहेत, ती मात्र प्रामाणिकपणे पाळली गेल्यास तांदूळ, नाचणी, तीळ यांचे पिकास सशक्त बाजारपेठ मिळू शकेल, असा प्रयत्न केला जावा.

**–इक्बाल शर्फ मुकादम उर्फ काका बुरोंडकर, पंचनदी–कोलथरे, ता. दापोली**

# नवी मुंबईतील मान्सूनपूर्व कामांचा आढावा

## गटारे, पदपथ, रस्ते लवकर पूर्ण करा; पालिका आयुक्तांचे आदेश

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेसह नवी मुंबईतील सर्व प्राधिकरणांच्या पावसाळापूर्व तयारीचा आढावा घेताना १८ एप्रिल रोजी महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी सुरू असलेली गटारे, पदपथ, रस्त्यांची कामे लवकर पूर्ण करून त्यानंतर कोणतेही बांधकाम होणार नाही असे स्पष्ट निर्देश दिले होते. तसेच पावसाळापूर्व नालेसफाई, गटारेसफाई, मलनि:स्सारण वाहिन्यांची सफाई ही कामेही जलद पूर्ण करण्याचे आदेशित केले होते. त्यानुसार झालेल्या कामाच्या सद्यस्थितीचा महानगरपालिकेच्या सर्व विभागांची विशेष बैठक घेत आयुक्तांनी विभागानिहाय बारकाईने आढावा घेतला.

सद्यस्थितीत सुरू असलेली कामे लवकर पूर्ण करावीत, असे निर्देश देताना त्यानंतरच्या काळात कोणतीही नवीन



कामे अगदी अत्यावश्यक गरज वगळता केली जाणार नाहीत याची दक्षता घेण्याचे आयुक्तांनी सूचित केले. याकरिता कार्यकारी अभियंता आणि संबधित विभागांचे सहा आयुक्त तथा विभाग अधिकारी यांनी कामे सुरू असलेल्या ठिकाणी स्वत: पाहणी करून कामे जलद होतील याकडे व्यक्तीश: लक्ष द्यावे, असे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले.

रस्त्यांची सुरू असलेली कामेही पूर्ण करण्याचे निर्देशित करतानाच कोणत्याही परिस्थितीत रस्त्यावर खड्डा पडलेला चालणार नाही, असे आयुक्तांनी स्पष्टपणे बजावले. एम.आय.डी.सी. भागातील त्यांच्या अखत्यारितील रस्ते व महानगरपालिकेच्या अखत्यारितील रस्ते यांची माहिती नागरिकांपर्यंत पोहचवावी असे सूचित करीत आयुक्तांनी ब्रीजेस तसेच बांधकामे, पदपथांचे कॉर्नर यांच्या कोपऱ्यावर उगवणाऱ्या झाडांच्या रोपट्यांमुळे भविष्यात होणारी हानी टाळण्यासाठी ती लगेच काढून टाकावीत, असेही निर्देशित केले.

नाल्यातील गाळ काढण्याचे काम युध्द पातळीवर पूर्ण करावे असे निर्देश देतानाच बंद गटारे सफाई करताना त्यामधून काढला जाणारा गाळ सुकण्यासाठी एक ते दोन दिवस लागतात हे लक्षात घेतले तरी त्यानंतर तो लगेच उचलला जाईल याची काटेकोर दक्षता घेण्यास त्यांनी सांगितले. पाणी साचण्याच्या संभाव्य ठिकाणी आवश्यकतेनुसार अतिरिक्त पंपांची व्यवस्था करण्यात यावी तसेच वाशी व सीबीडी बेलापूर येथील पम्पींग स्टेशनच्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात बॅकअप व्यवस्था ठेवण्याची काळजी घ्यावी, अशाही सूचना देण्यात आल्या.

पावसाळी कालावधीत रस्त्यावरील दिवाबत्ती तसेच सिग्नल यंत्रणा सुस्थितीत राहील याची दक्षता घेणे, रस्त्यावर प्रकाशाला अडथळा होणार नाही इतपतच विद्युत पथदिव्यांजवळील झाडांच्या फांदयाची छाटणी करणे, धोकादायक झाडे तसेच विद्युत खांब यांची त्वरित पाहणी करून त्याठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने तत्पर कार्यवाही करणे, धोकादायक इमारतींची यादी जाहीर करणे, अग्निशमन व सुरक्षाविषयक उपकरणे, वाहने, बोटी सुस्थितीत असतील याची खातरजमा करणे, पावसाळी कालावधीत साथीच्या आजारांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन त्यासाठी पुरेशा प्रमाणात औषधसाठा उपलब्ध करुन ठेवणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे अशा विविध महत्त्वाच्या बाबीवर आयुक्तांनी संबंधित विभागप्रमुखांना सतर्क राहून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

### संभाव्य धोकादायक ठिकाणांची पाहणी करावी

***सर्व विभाग कार्यालय क्षेत्रांतील दरड कोसळण्याची संभाव्य ठिकाणे, नाल्यातील बांधकामे, धोकादायक इमारती यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी व स्थलांतरित करणे गरजेचे असल्यास त्याबाबतची कार्यवाही त्वरित करणेचे निर्देश विभाग अधिकारी यांस देण्यात आले. कोणतीही आपत्ती सांगून येत नाही त्यामुळे आधीपासूनच सतर्क राहून संभाव्य ठिकाणांची पाहणी करावी व स्थलांतरणाबाबतचा योग्य निर्णय घ्यावा असे आयुक्तांनी या वेळी स्पष्ट केले.***

### २५ मेपासून २४ तास आपत्ती नियंत्रण कक्ष

***पावसाळी कालावधीत नागरिकांच्या सेवेसाठी विभाग कार्यालयामध्ये तसेच सर्व अग्निशमन केंद्रांमध्ये २५ मेपासून २४ तास आपत्ती नियंत्रण कक्ष सुरू होतील. याची दक्षता घेण्याचे व त्यांचे संपर्कध्वनी क्रमांक नागरिकांच्या माहितीसाठी जाहीर करण्याचे निर्देश देतानाच आयुक्तांनी अतिवृष्टीचा इशारा असेल तेव्हा सर्व यंत्रणा आपापल्या क्षेत्रात सज्ज असतील याची दक्षता घेण्याचे आदेश दिले. पावसाळा कालावधीत आपले मोबाइल बंद राहणार नाहीत व लगेच उचलले जातील याची विशेष दक्षता घेण्याचेही आयुक्तांनी या विशेष बैठकीप्रसंगी अधिकाऱ्यांना सूचित केले.***



## भोकरपाडा येथे ग्राम बिजोत्पादन कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज) यांच्या संयुक्त विद्यमानाने पनवेल तालुक्यातील भोकरपाडा, खानावळे या गावांत ग्राम बिजोत्पादन कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमात सचिन पाटील उपव्यवस्थापक ठाणे विभाग महाबीज यांनी ग्रामबिजोत्पादनसंदर्भात उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. ग्राम बिजोत्पादन मोहिमेंतर्गत महाबीजमार्फत शेतकऱ्यांना बियाणे उत्पादन कार्यक्रमात सहभागी करून घेण्यात येणार असून सहभागी शेतकऱ्यांना जया वाणाचे पायाभूत प्रकारचे भात बियाणे शासकीय दरात महाबीज मार्फत पुरवठा केला जाणार आहे, तसेच पेरणीपासून कापणीपर्यंत पिकाच्या विविध अवस्थेत भेटी देवून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले बियाणे महाबीजला विक्री करणे बंधनकारक असून महाबीज महामंडळ हे शासनाच्या किमान आधारभूत किमतीच्या २० टक्के जास्त दराने खरेदी करणार आहे. यासोबत बियाणे विक्रीसाठी लागणाऱ्या पिशव्या व हमाली रक्कम सुद्धा दिली जाणार आहे.

या अभिनव उपक्रमात गावातील शेतकऱ्यांनी सहभाग घेण्यासाठी पनवेलचे मंडळ कृषी अधिकारी आर. आर. पाचपुते यांनी आवाहन केले. या कार्यक्रमादरम्यान उपस्थित सर्व शेतकऱ्यांमध्ये ग्रामबिजोत्पादन कार्यक्रमाबाबत उत्साह व सहभागी होण्यास उस्फूर्तपणे अनुमती दर्शविली. या कार्यक्रमास गावचे पोलीस पाटील दत्तात्रेय गोविंद पाटील, प्रकाश आगिवले, कृषी सहाय्यक संगीता पाटील आदी उपस्थित होते.

# नवी मुंबई महापालिकेतर्फे विशेष कोविड-१९ लसीकरण मोहीम; नागरिकांना आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका हद्दीत कोविड-१९ लसीकरणाचे प्रमाण वाढविण्यासाठी पालिकेकडून १२ मे ते ३१ मे या कालावधीत विशेष कोविड-१९ लसीकरण मोहीम हाती घेण्यात आली आहे.

सद्यस्थितीत कोविडचा प्रभाव कमी झाल्यामुळे दुसरा डोस घेण्याची अथवा तिसरा प्रिकॉशन डोस घेण्याची विहित वेळ होऊनही लसीकरण करून घेण्याकरिता नागरिक फारसे पुढे येताना दिसत नाहीत असे चित्र आहे. मात्र पुरेशा प्रमाणात लसीकरण झाल्यामुळेच तिसऱ्या लाटेचा प्रभाव तितकासा जाणवलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे लसीकरणाचे महत्त्व लक्षात घेऊन तसेच जगातील इतर देशांतील विद्यमान कोविड स्थितीलक्षात घेता चौथ्या लाटेचा संभाव्य धोका नजरेसमोर ठेऊन कोव्हीड लसीकरणाचे दोन्ही डोस आणि निश्चित केलेल्या वयोगटांनी प्रिकॉशन डोस घेणे गरजेचे आहे. या मोहिमेंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या क्षेत्रात दररोज किमान दोन ठिकाणी लसीकरण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. याकरिता ७५० ठिकाणी निश्चित करण्यात आली असून यामध्ये नाके, मार्केट, बाजार, रेल्वे स्टेशन, बस डेपो, मॉल, रहिवाशी संघ अशा नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येतात अशा वर्दळीच्या ठिकाणी लसीकरण सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. याकरिता महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या एनएमएमटी बसेस उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

या मोहीमेमध्ये नवी मुंबई महानगरपालिका शाळेतील शिक्षकांचा महत्त्वाचा सहभाग असणार असून प्रत्येक नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सात शिक्षक व तीन मदतनीस असे समूह तयार करण्यात आले आहेत. या समुहांमार्फत नागरी आरोग्य केंद्राच्या परिसरातील नागरिकांपर्यंत पोहचून लसीकरणाचा दुसरा डोस अथवा प्रिकॉशन डोस न घेतलेल्या तसेच १२ वर्षांवरील लसीकरण न झालेल्या मुलांचे लसीकरण करून घेण्याकरिता जनजागृती, प्रबोधन व पुढाकार घेतला जाणार आहे.

नवी मुंबईत आत्तापर्यंत १८ वर्षांवरील १२,५४,४३६ नागरिकांनी पहिला डोस घेतला असून ११,३१,३४१ नागरिकांनी दोन्ही डोस घेतलेले आहेत तसेच ५७,३३२ नागरिकांनी प्रिकॉशन डोस घेतलेला आहे. त्याचप्रमाणे १५ ते १८ वर्ष वयोगटातील ८०,५८१ कुमार व युवकांनी पहिला डोस घेतला असून ६३,७५१ जणांनी दुसराही डोस घेतला आहे.

याशिवाय १२ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांना कोबिव्हॅक्स लस दिली जात असून ३८,७३१ मुलांनी पहिला डोस व २६,७५१ मुलांनी दोन्ही डोस घेतलेले आहे.

**कोविड १९ लसीकरणाचे प्रमाण वाढविण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका प्रयत्नशील असून १२ ते ३१ मे या कालावधीत राबविण्यात जाणाऱ्या विशेष कोविड १९ लसीकरण मोहीमेद्वारे लसीकरणाला गतीमानता देण्यात येत आहे व लसीकरणाव्दारे जास्तीत जास्त नागरिक कोविड लस संरक्षित व्हावेत याकरिता प्रयत्न करण्यात येत आहेत. तरी नवी मुंबई नागरिकांनी व मुलांनी आपल्या लसीकरणाच्या विहित कालावधीत लसीकरण करून घ्यावे.**

**-अभिजित बांगर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

# ॲमेटी विद्यापीठात रक्तदान शिबिर

### रसायनी पाताळगंगा रोटरी व रोटरॅक्ट क्लबचा उपक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील भाताण येथील ॲमेटी विद्यापीठात रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा, रोटरॅक्ट क्लब पाताळगंगा, ॲमेटी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ५२० विद्यार्थी व विद्यापीठ स्टाफचे ब्लड चेकअप रजिस्ट्रेशन झाले. यात विद्यार्थ्यांकडून रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून २२१ ब्लड बॅग्ज कलेक्ट झाल्या.

ॲमेटी विद्यापीठाचे व रोटरॅक्ट क्लब पाताळगंगाचे उत्कृष्ट नियोजन हॉलमध्ये शिबिर यशस्वीरित्या झाले. शिबिराच्या उद्घाटनाला



ॲमेटी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ए. डब्लू. संतोषकुमार, ॲमेटी कॉलेजचे विद्यार्थी, काउन्सिलचे प्रमुख डॉ. गौतम गवळी, रोटरी क्लब पाताळगंगाचे अध्यक्ष गणेश काळे, सेक्रेटरी संदीप साबळे, रोटरॅक्ट क्लब अध्यक्ष रोहन गावडे, सेक्रेटरी समृद्ध उचिल, ॲमेटी विद्यापीठ विद्यार्थी काउंन्सिलचे अध्यक्ष अभिषेक करीसिद्धीमठ, सेक्रेटरी रिद्धी मुनोथ व रोटरी क्लब पाताळगंगाचे सभासद शारदा काळे, उमा मुंढे, ऋतूजा भोसले, वर्षा पाटील, मेघा कोरडे, ॲनेट तनिष्का, बाळकृष्ण होनावळे, डॉ. मिलिंद भगत, दीपक चौधरी, देवेंद्र, गणेश वर्तक, सुनील कुरुप, अमित शहा, विजय पाटील आदी उपस्थित होते.

रोटरी ब्लड बँक न्यू पनवेल व तेरणा हॉस्पिटल ब्लडबँक न्यू पनवेल व त्यांच्या स्टाफने योग्यरित्या शिबिराची जबाबदारी स्वीकारली. शिबिराची सुरुवात होनावळे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून केली तसेच उपस्थित मान्यवर व ब्लडबँकेच्या कर्मचाऱ्यांचे व डॉक्टर्सचे आभार मानून शिबिराची सांगता झाली.

# नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी समर्पित आयोगाचा दौरा जाहीर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ग्रामीण आणि शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागास प्रवर्गातील आरक्षणासाठी जनतेची मते जाणून घेण्यासाठी आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संघटना यांची निवेदने स्वीकारण्यासाठी या समर्पित आयोगाने विभागवार कार्यक्रम जाहीर केला आहे. कोकण विभागात बुधवारी (दि. २५) दुपारी २.३० ते ४.३० वाजता समर्पित आयोग हे विभागीय आयुक्त कार्यालयात भेट देतील.

जि. प., पं. स., ग्रा. पं. आणि महापालिका, नगरपालिका, नगरपंचायती यांमध्ये नागरिकांच्या मागास प्रवर्गास आरक्षण देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे समर्पित आयोग गठीत केला आहे. समर्पित आयोग हा शनिवारी (दि. २१) सकाळी ९.३० ते ११.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालय पुणे येथे भेट देतील. रविवारी (दि. २२) सकाळी ९.३० ते ११.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद तर याच दिवशी सायंकाळी ५.३० ते ७.३०पर्यंत विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे भेट देतील. शनिवारी (दि. २८) सकाळी ९.३० ते ११.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती तर याच दिवशी सायंकाळी ४.३० ते ६.३० वाजेपर्यंत विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर येथे भेट देतील.

या समर्पित आयोगाच्या भेटीच्या वेळी नागरिकांना मते वेळेत मांडता यावीत आणि निवेदन देता यावेत, यासाठी संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयात आपल्या नावाची नोंदणी भेटीच्या दिनांकापूर्वी करावी, तसेच यासाठी संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाशी संपर्क करावा, असे आवाहन या समर्पित आयोगाचे सदस्य सचिव पंकज कुमार यांनी केले आहे.

# थकवा दूर करण्यासाठी ऊसाच्या रसाला मागणी

**उरण : वार्ताहर**

उन्हाच्या झळा दिवसेंदिवस वाढू लागल्याने उरणकर त्रस्त झाले आहेत. उन्हाच्या वाढत्या तीव्रतेमुळे शहराच्या विविध रस्त्यांवरील असलेली रसवंतीगृहे अथवा पारंपरिक पद्धतीने ऊसाचा रस विकणारे छोटे रसविक्रेते यांच्या ठेल्यावर मोठी गर्दी होत आहे.

रणरणत्या उन्हात ऊसाचा ताजा रस प्यायल्याने सगळा ताणतणाव, थकवा दूर होत असून पुन्हा कामासाठी नवचैतन्य संचारते, उरण शहरात नयन अपार्टमेंट समोर, पालवी हॉस्पिटल, उरण चारफाटा, कोट नाका, पेन्शनर पार्क आदी



ठिकाणी उसाच्या रसाची दुकाने आली आहेत.

महाराष्ट्रासह उरण शहरात कमालीची उष्णता वाढल्याने नागरिकांना उन्हाचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. अशातच सेल्समन, फिरतीवर काम करणारे कामगार, लहान मुले, महिलावर्ग, वयस्कर मंडळी आदीच्या शरीराची उन्हाळ्यात लाहीलाही होत आहे. त्यामुळे उन्हाचा चटका वाढताच रसवंतीतील लगबग वाढली आहे. उष्णता कमी करून थकवा दूर करणारे सर्वांचे आवडते पेय म्हणजे ऊसाचा रस. त्यामुळे काही दिवसांपासून रसवंती गृहाकडे नागरिकांची गर्दी वाढत आहे. गरीब कुटुंब पारंपरिकता हातगाड्यावर लाकडी रस मशीनद्वारे तर काही आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने ऊसाचा रस विकून उदरनिर्वाह करतात. ग्राहकांची पसंती लाकडाच्या गाडीवर पारंपारिक पद्धतीने पिळलेल्या जाणाऱ्या रसाला अधिक पसंती आहे.

**उन्हाळ्यात चार महिने ऊसाच्या रसाला मोठ्या प्रमाणात मागणी असते. ऊसाचा रस प्यायला ग्राहकांची खूप गर्दी असते. काही रसवंत्या वर्षभरही चालवल्या जातात, तर उन्हाळ्यात व्यवसाय म्हणून चार महिन्यांसाठी गुंतवणूक करून रसवंती थाटणाऱ्यांची संख्याही या काळात चांगलीच वाढली आहे.**

**-ज्ञानेश्वर दामगुडे,**
**जय भवानी रसवंती गृह, उरण**

# आरंभ महोत्सवात इंडियन आयडॉल विजेता सागर म्हात्रेची उपस्थिती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

शेडुंग येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठात शिक्षण घेत असलेल्या तरुणांत उत्साह निर्माण व्हावा या उद्देशाने आरंभ या महोत्सवाद्वारे रिफ्रेशमेंट व फ्रेशर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मराठी इंडियन आयडॉल सागर म्हात्रे यांच्यासह कॉलेज युवकांनी धमाल करून कार्यक्रमाला रंगत आणली. या कार्यक्रमावेळी विद्यापीठाच्या मुख्याधिकारी आणि प्रमुख पाहुण्यांद्वारे दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

गणेश स्तवनाने मनोरंजनाच्या कार्यक्रमास सुरुवात झाल्याने विद्यार्थ्यांनी गजबजलेला संपूर्ण हॉल एकच जल्लोष करत होता. त्यानंतर रॅप साँग, स्टॅन्डअप कॉमेडी, सोलो साँग, फॅशन शो, मिस ॲण्ड मिसेस इंडिया अशा विविध प्रकारचे आयोजकांकडून मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर करत विद्यार्थी प्रेक्षकांचे मने जिंकण्यात आली.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या मराठी इंडियन आयडॉल विजेता सागर म्हात्रे याने मराठी, हिंदी, कोळीगीतांचे सादरीकरण केले. त्याच्या हस्ते पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम झाला.

या वेळी विद्यापीठाचे चेअरमन डॉ. केशव बढाया, सीईओ मुकेश सोनी, व्हाईस चान्सलर ए. के. सिन्हा, रजिस्टार आर. पी. शर्मा, डॉ. सविता अग्रवाल आदींसह छत्रपती शिवाजी महाराज युनिव्हर्सिटीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.




(छाया : राकेश खराडे)



# उन्हात जनावरांना चारा, पाण्यासाठी भांड्यांची व्यवस्था

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

द्रोणागिरी सामाजिक कला क्रीडा शैक्षणिक सांस्कृतिक संस्था बोकडविरा यांच्यातर्फे गुरुवारी (दि. १२) सकाळी रस्त्यावरील अनाथ गाई व पक्षी यांना पाणी पिण्यासाठी व चारा, दाणे ठेवण्यासाठी बोकडविरा ते सिडको ट्रेनिंग सेंटर या परिसरात भांडी ठेवण्यात आली आहेत.

अतिशय कडक उन्हाळा सुरू आहे. अशा वेळेस अनाथ गाई, पक्षी यांचा पाण्याअभावी तडफडून मुत्यू होऊ नये. त्यांची गैरसोय होऊ नये. या उद्देशाने निस्वार्थ सेवेसाठी द्रोणागिरी सामाजिक कला क्रिडा शैक्षणिक सांस्कृतिक संस्थेचा हा स्तुत्य उपक्रम राबविला आहे.

परिसरात ठेवण्यात आलेल्या भांड्यामध्ये चारा, चपाती, पक्ष्यांसाठी दाणे, पाणी टाकावे जेणेकरून अन्न मातीत पडून खराब व सुकणार नाही. जनावरांना खाण्याजोगी राहील, असे आवाहन संस्थेच्या वतीने नागरिकांना करण्यात आले आहे.

या उपक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते विकास पाटील, घनश्याम पाटील, शिवकुमार पाटील, नरेंद्र पाटील, गंगाराम पाटील, शिवाजी ठाकूर, जितेंद्र पाटील, दिप्ती पाटील, मंजुळा पाटील, मयुरी तांडेल, प्राजक्ता तांडेल, पुष्पलता पाटील, यशवंत ठाकूर आदी उपस्थित होते.

# मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी

## वाकण, वडखळ, पेण, माणगावनजीक वाहनांच्या लागल्या रांगा

**पाली : प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या दिवसात सागर किनारे व पर्यटनस्थळे बहरली आहेत. शुक्रवार, शनिवार, रविवार व सोमवार अशा सलग सुट्ट्या आल्याने पर्यटक, नागरिक मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडले आहेत. त्यामुळे कोकणात जाणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांची गर्दी उसळली आहे. शुक्रवारी व शनिवारी सकाळपासून दुपारपर्यंत पेण, वडखळ, वाकण, माणगाव याठिकाणी तासन्तास वाहतूक कोंडी झाली होती. तीन ते चार किमी वाहनांच्या रांगा लागल्याने प्रवाशांचे अतोनात हाल झाले.

उन्हाळयाची सुट्टी पडल्याने सध्या चाकरमानी, कोकणवासीयांची गावी ये-जा सुरू आहे. कोकणाकडे जाणाऱ्या एसटी बसेस फुल्ल जात आहेत. त्याचबरोबर पर्यटकदेखील कोकणातील पर्यटनस्थळांकडे निघाले आहेत. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर खाजगी वाहनांची वर्दळ वाढली आहे. त्यातच वीकेण्डला जोडून आलेल्या सुट्ट्यांमध्ये पर्यटकांनी अलिबाग, मुरूड, जंजिरा, नागाव, श्रीवर्धन, हरिहरेश्वर, पाली आदी ठिकाणी जाणे पसंत केल्याने मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांची प्रचंड गर्दी झाली आहे. त्यामुळे पाली, माणगाव, इंदापूर, कोलाड, पेण व वडखळ बायपास आदी ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. तर काही वेळेस वाहतूक धिम्या गतीने सुरु असते. अरुंद रस्ता, रस्त्यावरील हातगाड्या व फेरीवाले, दुतर्फा उभी केलेली वाहने आणि वाहनांची जास्त संख्या यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर वाकण नाका, पाली बाजारपेठ, माणगाव शहरातदेखील वाहतूक कोंडी होत आहे.

मुंबई-गोवा महामार्ग माणगाव शहरातून जातो येथे डिव्हायडर टाकून दोन्ही बाजूची वाहतूक सुरू ठेवली आहे. त्यामुळे तेथे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून वाहतूक धीम्या गतीने सुरू असते.

### प्रवासी, चाकरमानी, पर्यटकांचे हाल



**अनेक वाहनचालकांकडून नियमांचे उल्लंघन**

बेशिस्त वाहनचालक, अवजड वाहने, लेन सोडून पुढे जाणारी वाहने तसेच महामार्गाचे सुरु असलेले काम यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळविण्यासाठी वाहतूक पोलीस महामार्गावर ठिकठिकाणी तैनात आहेत. तसेच नाक्यांवर पोलीस चौक्या उभारल्या आहेत. परंतू महामार्गावरील वाहतुकीचा भार बघता पोलिसांवर वाहतूक कोंडी सोडविताना ताण येत आहे.

## एक्स्प्रेस वेवर ट्रेलर, टेम्पोचा अपघात, एक जण ठार



**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अंडा पॉईंटजवळ शुक्रवारी (दि. १३) सकाळी सात वाजण्याच्या सुमारास भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रेलरने पुढील टेम्पोला धडक दिली. त्यामुळे दोन्ही वाहने महामार्गावरच पलटी झाली. या अपघातात एकाचा मृत्यू झाला. या अपघातामुळे वाहतुकीचा मोठ्या प्रमाणात खोळंबा झाला होता.

बोरघाटात मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या ट्रेलरच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रेलरने पुढे जाणाऱ्या टेम्पोला मागून जोरदार धडक दिली. त्यानंतर दोन्ही वाहने महामार्गावरच पलटी झाली. या अपघातात ट्रेलर चालकाचा जागीच मृत्यू झाला. आयआरबी यंत्रणा, देवदूत, डेल्टा फोर्स, तसेच बोरघाट व खोपोली पोलीस घटनास्थळी दाखल झाले. ट्रेलरच्या केबिनमधून मृत चालकास बाहेर काढल्यानंतर क्रेनच्या सहाय्याने दोन्ही वाहने रस्त्याच्या बाजूला करण्यात आली. दरम्यान, दोन्ही बाजूच्या लेनवर मोठ्या प्रमाणात वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. अपघातग्रस्त वाहने तासाभरानंतर बाजूला केल्यानंतर हळूहळू महामार्ग सुरू करण्यात यश आले.

दरम्यान, द्रुतगती मार्गावर वाहतूक खोळंबा झाल्याने काही वाहन चालकांनी जुन्या मुंबई-पुणे महामार्गाचा वापर केला. पण बेशिस्त वाहन चालकांमुळे जुना मुंबई-पुणे महामार्गही बाधित झाला. या महामार्गावरही मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचे ते दृश्य पहावयास मिळाले.सावरली टोल नाक्यावर वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या होत्या.

## कर्जत नांदगाव सरपंचाने पदाचा गैरवापर करून कुटुंबीयांना केले लखपती; आयुक्तांची कारवाई

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायतच्या थेट सरपंच दीपिका भानुदास जंगले तथा दीपिका नाना आसवले यांना पदाचा गैरवापर केल्याप्रकरणी दोषी ठरवून कोकण विभागीय आयुक्तांनी अपात्र ठरवले आहे.

सरपंच म्हणून काम करताना दीपिका आसवले-जंगले यांनी आपले कुटुंबीय आणि नातलगांना आर्थिक फायदा मिळवून दिला. तसेच सुमारे ४० लाख रुपयांचा अपहार केल्याबद्दल ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थांनी तक्रारी अर्ज दाखल केले होते. त्यावर कोकण विभागीय आयुक्तांनी दीपिका आसवले-जंगले यांना थेट सरपंच पदावरून बडतर्फ करतानाच त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या दीपिका आसवले-जंगले या २०१८मध्ये नांदगाव ग्रामपंचायतीच्या थेट सरपंच पदावर निवडून आल्या होत्या. त्यांचे सरकारी नोकर असलेले पती नेहमी ग्रामपंचायत कार्यालयात येऊन सरपंच यांच्या खुर्चीत बसायचे. त्यावरून वादंगही निर्माण झाला होता. ग्रामपंचायतीचा मुद्रांक शुल्क,१४ वा आणि १५ वा वित्त आयोगांचा निधी खर्च करताना सरपंच दीपिका आसवले-जंगले यांनी ग्रामपंचायत सदस्यांना विचारत घेतले नाही तसेच आपल्या कुटुंबीय, नातलगांना आर्थिक लाभ दिला. १४ वित्त आयोगाची कामे, मुद्रांक आणि आपल्याला हवे असलेले धनादेश तत्कालीन ग्रामविकास अधिकारी विकास सराई यांच्या घरी जाऊन धमकावून घेतले असल्याचे त्यांनी चौकशी समितीला दिलेल्या आपल्या उत्तरात लिहून दिले आहे.

सरपंच दीपिका आसवले-जंगले यांनी ग्रामपंचायत कार्यालय सुस्थितीत असताना त्यांची दुरुस्ती काढली आणि बिल काढून ते काम अर्धवट ठेवले. त्यामुळे नांदगाव ग्रामपंचायत कार्यालय जिल्हा परिषद शाळेत भरावले जात आहे. कोविड काळात तब्बल १३ लाखाची बिले वेगवेगळ्या एजन्सीकडून मिळविली आणि निधी लाटण्याचे काम केले. त्या काळात खरेदी केलेल्या वस्तू नांदगाव ग्रामपंचायत हद्दीमधील लोकांच्या घरी पोहचल्या नाहीत. असा सुमारे ४० लाख रुपयांचा अपहार सरपंच दीपिका आसवले-जंगले यांनी केल्याच्या तक्रारी ग्रामपंचायत सदस्य उज्वला रवींद्र फोपे व अन्य सदस्यांनी कर्जत पंचायत समितीकडे केल्या होत्या. त्यानंतर चौकशी समितीसमोरदेखील सरपंच दीपिका आसवले-जंगले हजर राहिल्या नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांनी रायगड जिल्हा परिषद आणि कोकण विभागीय आयुक्तांकडे पाठपुरावा केला.

कोकण विभागीय महसूल आयुक्त विलास पाटील यांनी ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम ३५ नुसार दीपिका आसवले-जंगले यांना सरपंच पदासाठी अपात्र ठरविले तसेच त्यांच्यावर कर्जत पंचायत समितीने फौजदारी कारवाई करावी आणि नांदगाव ग्रामपंचायतीमधील सदस्यांची विभागीय पातळीवर चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

## कोरोनामध्ये पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांना 'प्राईड इंडिया'कडून मदत

**महाड : प्रतिनिधी**

कोरोना महामारीमध्ये ज्या मुलांनी पालकत्व गमावले आहे, अशा महाड तालुक्यतील निराधार मुलांसाठी प्राईड इंडिया या संस्थेने शैक्षणिक मदतीचा हात पुढे केला आहे. गरीब कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे तसेच स्वच्छता साहित्याचेदेखील वाटप करण्यात आले.



महाड तालुक्यात गेली चाळीस वर्षे सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या प्राईड इंडिया या संस्थेने कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमध्ये पालकत्व गमावलेल्या १२ कुटुंबांतील मुलांना शिक्षण व आरोग्य खर्चासाठी प्रत्येकी तीस हजार रुपयांचे धनादेश दिले. सक्षम प्रकल्पांतर्गत महाड तालुक्यातील ४३ पोलादपूर १२, माणगाव २९, पाली १४ अशा एकूण ९८ विद्यार्थ्यांना मदत करण्यात येत आहे. यासाठी रिया व नील यांच्या नॉरवेस्ट या संस्थेमार्फत ६० विद्यार्थी व महानगर गॅस निगम लिमिटेड यांच्यामार्फत ३८ विद्यार्थ्यांना मदत केली जात आहे. शैक्षणिक साहित्य, जादा क्लासेस, संगणक अभ्यास, शालेय गणवेश, आरोग्य खर्च यातून पूर्ण केला जात आहे. ० ते ५ वयोगटातील मुलांना पूरक पोषण आहार व सर्व कुटुंबांना दर महिन्याला किराणा साहित्य लघु उद्योग सुरू करण्यासाठी मार्गदर्शन व सहकार्यदेखील केले जात आहे.

संस्थेच्या मानद संचालिका ईषाताई मेहरा, संस्थेच्या सीईओ मोरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक श्री धामणस्कर, श्री. भोईर, श्री. गायकवाड, प्रभाकर सावंत, प्रभाकर गोरुले आदींनी त्यासाठी मेहनत घेतली.

## रोह्यात प्लास्टिकचा वापर वाढला

### मुक्या जनावरांचे आरोग्य धोक्यात

**रोहे : प्रतिनिधी**

पर्यावरणाला हनीकारक असलेल्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर शासनाने बंद केला होता. ज्याचे विघटन होत नाही अशा प्लास्टीकवर बंदी घालण्यात आली होती. मात्र रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात प्लास्टिक पिशव्यांचा दैनंदिन जीवनात वाढला वापर आहे.

नगर परिषदेने सातत्याने बंदी घातलेल्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्यांच्या विरोधात जनजागृती व कारवाई केल्याने सुरुवातीला रोहा शहरात प्लास्टिक पिशव्यांचा वापर बंद झाला होता. परंतु आता पुन्हा एकदा प्लास्टिक पिशव्यांचा वापर वाढला आहे.

बंदी घातलेल्या प्लास्टिकचा वापर नागरिकांनी करु नये यासाठी जनजागृती करण्यात आली होती. नगर परिषदेच्या वतीने दुकानदारांना नोटीसा काढण्यात आल्या होत्या. जनजागृती रॅली काढण्यात आली होती.तरीसुध्दा प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर नगर परिषदेच्या वतीने रोहा शहरात दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्यामुळे प्लास्टिकचा वापर कमी झाला होता. आता पुन्हा एकदा प्लास्टिक पिशव्यांचा वापर वाढला आहे. छोटे व मोठे विक्रेते प्लास्टिक पिशव्यांचा वापर करताना दिसत आहेत. त्यामुळे रोहा शहरासह ग्रामीण भागात प्लास्टिक कचरा वाढला आहे.

प्लास्टिक पिशव्यातील खाद्यपदार्थ मुकी जनावरे खातात. या अन्नाबरोबरच प्लास्टिकही गुरांच्या पोटात जात असल्याने त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.प्लास्टिक पिशव्यांचा विरोधात ठोस पावले उचलण्याची गरज आहे.



## पेणमध्ये एक दिवस नदी स्वच्छता उपक्रम



**पेण : प्रतिनिधी**

येथील भोगावती नदी जवळ जवळ ६५ टक्के गाळाने भरलेली आहे. भविष्यात या नदीचे गटार होईल की काय? अशी अवस्था झाली आहे. वृक्षमित्र उदय मानकवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी एक दिवस नदी स्वच्छता उपक्रम हाती घेऊन भोगावती नदीतील गाळ काढला.

या उपक्रमाविषयी बोलताना उदय मानकवळे यांनी सांगितले की, आपण सर्वांनी मिळून एक दिवस नदी स्वच्छतेसाठी देऊ या. नद्या आहेत म्हणून धरणे आहेत आणि धरणे आहेत म्हणून आपल्याला पाणी मिळत आहे. नदीवर मानवी व अनेक जीव जंतूंचा विकास अवलंबून आहे. आज नद्यांची अवस्था बिकट झाली आहे. त्यामुळे आपण आपल्या आयुष्यात एखादा दिवस नदी स्वच्छतेसाठी देणे गरजेचे आहे, अशी माहिती उदय मानकवळे यांनी दिली.

## खोपोलीतील लव्हेज ग्रामस्थांनी प्रभाग रचनेवर नोंदविली हरकत

**खोपोली : प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार रायगड जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या नेतृत्वाखाली खोपोली नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप रचना जाहीर करण्यात आली असून, यात विविध प्रभागातून आक्षेप नोंदवले जात आहेत. या पार्श्वभूमीवर लव्हेज गावातील (प्रभाग क्रमांक एक) ग्रामस्थांनीही प्रभाग रचनेवर आक्षेप घेतला असून, त्याबाबतचे निवेदन त्यांनी शनिवारी (दि. १४) खोपोली नगर परिषद कार्यालयात दिले आहे.



सध्या प्रभाग क्रमांक एकची रचना लव्हेज गाव, मस्को कॉलनी, सुभाष नगर व वासरंग गावाचा काही भाग यात येत आहे. गेली अनेक वर्षे या गावाचा विकास झालेला नाही. ग्रामस्थांना लोकप्रतिनिधीकडे समस्या घेऊन जाताना तीन किलोमीटरची पायपीट करावी लागते.

ग्रामस्थांच्या मागणीनुसार सध्याचा भौगोलिक विचार करतात लव्हेज गाव, उदय विहार, श्रीरामनगर व सरस्वती नगर असा प्रभाग हा ग्रामस्थांना सोयीचा पडेल, असे नगर परिषद प्रशासनाला दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सध्याच्या प्रभागातील लोकप्रतिनिधींना भेटावयास असल्यास रेल्वे ट्रॅक दोन वेळा ओलांडावे लागतात व तीन किमी पायपीट करावी लागते. लव्हेज गावासह, श्रीरामनगर, उदयविहार, सरस्वतीनगर हे या प्रभागाच्या शंभर मीटर अंतरावर असल्याने सर्वांनाच हे सोयीचे होणार आहे, असा ग्रामस्थांनी दावा केला आहे. ग्रामस्थांच्या वतीने किशोर पाटील, संजय पाटील, गोविंद रेवाळे, काशिनाथ पाटील, सुरेश थरकुडे, अरुण पाटील व समीर शिंदे यांनी उपस्थित नगर परिषद अधिकाऱ्यांना निवेदन दिले.


## रोहा तळाघरमध्ये वारकरी किर्तन सोहळा उत्साहात

**धाटाव : प्रतिनिधी**

कोकण श्री विठ्ठल परिवाराच्या वतीने तळाघर (ता. रोहा) येथील महादेव मंदिरात गुरुवारी (दि. १२) किर्तन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

भक्तीमार्गाचा प्रचार व्हावा, या हेतूने कोकण श्री विठ्ठल परिवाराच्या वतीने तळाघर महादेव मंदिरात दरवर्षी किर्तन सोहळा आयोजित केला जातो. त्यासाठी रोहा परिसरातील युवकांचा तसेच तळाघर ग्रामस्थांकडून सहकार्य मिळत असते.

गुरुवारी झालेल्या किर्तन सोहळ्यात सकाळी काकड आरती, अभिषेक, ज्ञानेश्वरीतील अध्याय क्रमांक नऊ आणि १२ यांचे पारायण, दुपारी गाथा भजन, सायंकाळी हभप मारुती महाराज कोल्हटकर याचे प्रवचन झाले. या वेळी रोहा विभागातील कोविड योध्दे यांच सत्कार करण्यात आला. रात्री हभप एकनाथ महाराज चत्तर शास्त्री (अहमदनगर) यांचे सुश्राव्य किर्तन झाले.



# पंजाबचा बंगळुरूवर दणदणीत विजय

**मुंबई : प्रतिनिधी**

लियाम लिव्हिंगस्टोन आणि जॉनी बेअरस्टो यांची फलंदाजी आणि कॅसिगो रबाडा आणि अन्य गोलंदाजांनी दिलेली उत्तम साथ याच्या जोरावर आयपीएलमध्ये शुक्रवारी झालेल्या साखळी सामन्यात पंजाब किंग्जने रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरू संघावर ५४ धावांनी दणदणीत विजय मिळवला. पंजाबने विजयासाठी दिलेले २१० धावांचे लक्ष्य गाठताना बंगळुरू संघ १५५ धावाच करू शकला.



पंजाबने दिलेल्या २१० धावांचे लक्ष्य गाठताना बंगळुरू संघाची दमछाक झाली. सलामीला आलेली फॅफ डू प्लेसिस (१०) आणि विराट कोहली (२०) ही जोडी खास कामगिरी करू शकली नाही. सलामीचे हे दोन्ही फलंदाज स्वस्तात बाद झाल्यानंतर मधल्या फळीतील फलंदाज चांगली खेळी करतील अशी अपेक्षा होती, मात्र त्यांनीदेखील निराशा केली. रजत पाटीदारने २६ धावा केल्या. त्यानंतर महिपाल लॉमरोर (६) स्वस्तात बाद झाला.

चौथ्या विकेटसाठी आलेल्या ग्लेन मॅक्सवेलने संघाला सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र ३५ धावांवर असताना तो बाद झाला. त्यानंतर बंगळुरूचा फिनिशर म्हणून ओळख असलेल्या दिनेश कार्तिकचाही निभाव लागला नाही. त्याने अवघ्या ११ धावा केल्या. त्यानंतर शेवटच्या फळीतील फलंदाजही निराशाजनक कामगिरी करीत तंबुत परतले. परिणामी २० षटके संपेपर्यंत बंगळुरू संघ नऊ गडी बाद १५५ धावाच करू शकला.

तत्पूर्वी बंगळुरू संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यामुळे पंजाब किंग्जने फलंदाजीसाठी उतरत सुरुवातीपासूनच धडाकेबाज खेळी केली. सलामीला आलेल्या जॉनी बेअरस्टोने २९ चेंडूंमध्ये सात षटकार आणि चार चौकार लगावत ६६ धावा केल्या. शिखर धनवने २१ धावा करीत बेअरस्टोला साथ दिली. या जोडीने ६० धावांची भागिदारी केली. दुसऱ्या विकेटासाठी आलेल्या भानुका राजपक्षेने (१) मात्र निराशा केली.

तिसऱ्या विकेटसाठी आलेल्या लियाम लिव्हिंगस्टोने तुफान फटकेबाजी करीत ४२ चेंडूंमध्ये ७० धावा केल्या. लिव्हिंगस्टोन बाद झाल्यानंतर पंजाबचे शेवटच्या फळीतील फलंदाज खास कामगिरी करू शकले नाहीत. शेवटच्या फळीतील जितेश शर्माने नऊ, तर हरप्रित बाबर आणि ऋषी धवनने प्रत्येकी सात धावा केल्या. राहुल चहर (नाबाद) फक्त दोन धावा करू शकला.

## थॉमस चषक बॅडमिंटन स्पर्धा

# पुरुष संघाची अंतिम फेरीत धडक

**बँकॉक : वृत्तसंस्था**

भारतीय पुरुष संघाने बलाढ्य डेन्मार्कला ३-२ असे नमवून थॉमस चषक बॅडमिंटन स्पर्धेची अंतिम फेरी गाठण्याचा पराक्रम केला आहे. अंतिम फेरीत भारताचा सामना रविवारी (दि. १५) इंडोनेशियाशी होणार आहे.

सात्त्विकसाइराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांच्या दुहेरीतील विजयानंतर किदम्बी श्रीकांत आणि निर्णायक लढतीत एचएस प्रणॉय यांनी एकेरीचे विजय मिळवत भारताच्या यशात सिंहाचा वाटा उचलला.

एकेरीच्या पहिल्या सामन्यात व्हिक्टर एक्सलसेनने लक्ष्य सेनचा २१-१३, २१-१३ असा पाडाव करून १-० अशी आघाडी मिळवली. मग दुसऱ्या दुहेरीच्या सामन्यात रंकीरेड्डी आणि शेट्टी जोडीने किम अॅस्ट्रूप आणि मथायस ख्रिस्टियानसन जोडीचे आव्हान २१-१८, २१-२३, २२-२० असे मोडित काढले. एक तास १८ मिनिटांच्या कडव्या झुंजीमुळे सात्त्विक-चिराग जोडीने भारताला १-१ अशी बरोबरी साधून दिली.

एकेरीच्या तिसऱ्या सामन्यात श्रीकांतने अँडर्स अँटनसनला २१-१८, १२-२१, २१-१५ असे नामोहरम करीत भारताला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर दुहेरीच्या चौथ्या सामन्यात कृष्णा प्रसाद गर्गा आणि विष्णूवर्धन गौड जोडीने १४-२१, १३-२१ अशी ३९ मिनिटांत हार पत्करली. त्यामुळे डेन्मार्कला २-२ अशी बरोबरी साधता आली. अखेरीस पाचव्या सामन्यात प्रणॉयने एक तास १३ मिनिटांत रॅसमूस गेमकेला १३-२१, २१-९, २१-१२ असे हरवून भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.



# पेण येथे थांग-ता मार्शल आर्ट प्रशिक्षण शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुका क्रीडा संकुल येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अलिबाग अंतर्गत तालुका क्रीडा संकुल पेण आयोजित उन्हाळा सुटीतील शिबिरात पाच दिवसीय थांग-ता मार्शल आर्ट प्रशिक्षण देण्यात येत आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक व पेण तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा थांग-ता असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र म्हात्रे तसेच थांग-ता राष्ट्रीय पदकप्राप्त जान्हवी वनगे, रविना म्हात्रे, प्राजक्ता तेटमे, विनायक पाटील, प्रथमेश मोकल यांच्या उपस्थितीत थांग-ता मार्शल आर्ट प्रशिक्षणास सुरुवात झाली. यामध्ये पेण मधील मुला-मुलींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला आहे.





(छाया : अनिस मनियार)

## विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत भारताने चार 'सुवर्ण' जिंकली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय नेमबाजांनी कनिष्ठ विश्वचषक स्पर्धेतील दमदार कामगिरी सुरूच ठेवत शुक्रवारी चार सुवर्णपदकांची कमाई केली.

पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल प्रकाराच्या सांघिक गटात रुद्राक्ष पाटील, पार्थ मखिजा आणि उमामहेश माद्दिनेनी यांनी, तर १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात सौरभ चौधरी, शिवा नरवाल आणि सरबजोत सिंग या तिघांनी सुवर्णपदक जिंकले. महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात मनू भाकर, पलक आणि ईशा सिंग यांनी, तर महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात आर्या बोरसे, झीना खिट्टा आणि रमिता यांनी सुवर्णपदक आपल्या नावे केले.

## द. आफ्रिकेविरुद्ध मालिकेसाठी कोहली, जडेजाला विश्रांती?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आगामी पाच ट्वेन्टी-२० सामन्यांच्या मालिकेसाठी धावांसाठी झगडणाऱ्या विराट कोहली आणि रवींद्र जडेजाला विश्रांती दिली जाण्याची शक्यता आहे.

चेतन शर्मा यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय निवड समितीची बैठक आयपीएलच्या उत्तरार्धात होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. इंग्लंडविरुद्धच्या महत्त्वाच्या दौऱ्यासाठी कोहलीला सज्ज होता यावे याकरिता त्याला आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेसाठी विश्रांती दिली जाणार आहे. आयपीएलच्या निमित्ताने गेले दोन महिने कोहली जैव-सुरक्षा परिघात आहे. तो सध्या कारकीर्दीतील सर्वांत कठीण कालखंडातून जात असून गेली तीन वर्षे त्याला शतक साकारता आलेले नाही. यंदाच्या आयपीएल हंगामात फक्त एका अर्धशतकासह त्याला २१६ धावाच करता आल्या आहेत.

भारतीय संघ ९ ते १९ जून या कालावधीत आफ्रिकेविरुद्ध दिल्ली, कटक, विशाखापट्टणम, राजकोट आणि बंगळूरु येथे पाच ट्वेन्टी-२० सामने खेळणार आहे. त्यानंतर भारतीय संघ आयर्लंड आणि इंग्लंडला जाणार आहे.

# 'डीआरएस' अभावी आम्हाला फटका बसला

### *मुंबईविरुद्धच्या पराभवानंतर चेन्नईचे प्रशिक्षक फ्लेमिंग यांची नाराजी*



**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटमध्ये गुरुवारी मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात सुरुवातीला 'डीआरएस' उपलब्ध नसल्याचा आम्हाला फटका बसला. आम्ही डावाच्या सुरुवातीलाच गडी गमावले. त्यानंतर पुनरागमन करणे आम्हाला शक्य झाले नाही, अशी नाराजी चेन्नई सुपर किंग्जचे प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिग यांनी व्यक्त केली.

चेन्नई आणि मुंबई या संघांमध्ये गुरुवारी वानखेडे स्टेडियमवर सामना झाला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना चेन्नईचा डाव अवघ्या ९७ धावांत आटोपला आणि मुंबईने हे आव्हान १४.५ षटकांत गाठले. त्यामुळे चेन्नईचा संघ बाद फेरीच्या शर्यतीतून बाहेर गेला आहे. या सामन्याच्या सुरुवातील वानखेडे स्टेडियममधील वीजप्रवाह खंडित झाल्याने चेन्नईला डावातील पहिल्या १० चेंडूंसाठी 'डीआरएस'चा वापर करता आला नाही. या दहा चेंडूंमध्ये चेन्नईने पाच धावांतच तीन बळी गमावले होते, मात्र पंच चिरा रवीकांतरेड्डी आणि ख्रिस गॅफनी यांनी दिलेले काही निर्णय हे प्रश्नांकित होते.

डावाच्या दुसऱ्या चेंडूवर मुंबईचा डावखुरा वेगवान गोलंदाज डॅनियल सॅम्सने चेन्नईचा सलामीवीर डेवॉन कॉन्वेला पायचीत पकडले, मात्र चेंडू उजव्या यष्टीबाहेर जात असल्याचे 'रिप्ले'मध्ये दिसले. पुढच्या षटकात जसप्रीत बुमराच्या गोलंदाजीवर पंच गॅफनी यांनी रॉबिन उथप्पाला पायचीत ठरवले, पण पंचांच्या या निर्णयावरही प्रश्न उपस्थित करण्यात आले.

'काही तांत्रिक कारणांमुळे डावाच्या सुरुवातीला 'डीआरएस' उपलब्ध नसणे हे आमचे दुर्दैव होते. पंचांच्या निर्णयाने आणि एकंदर परिस्थितीने आम्ही निराश आहोत, परंतु हा खेळाचा भाग आहे, असे म्हणण्याशिवाय आमच्याकडे पर्याय नाही. सामन्याच्या सुरुवातीलाच काही निर्णय आमच्या विरोधात गेले. त्यामुळे आमचे नुकसान झाले आणि त्यातून सावरण्यात आम्हाला अपयश आले. आम्हीसुद्धा अधिक चांगला खेळ करू शकलो असतो,' असे सामन्यानंतर फ्लेमिंग म्हणाले.

# पंजाबच्या विजयाने आयपीएल प्लेऑफचे गणित बदलले

## बंगळुरूसह चार संघांचे टेन्शन वाढले

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२२मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा पंजाब किंग्जकडून ५४ धावांनी पराभव झाला. या पराभवानंतर त्यांच्या प्लेऑफमध्ये पोहचण्याचा मार्ग अवघड झाला आहे. पंजाबच्या विजयाने प्लेऑफचे समीकरण आणखी क्लिष्ट झालंय. बंगळुरूविरुद्ध पंजाबचा पराभव झाला असता तर त्याचे आव्हान संपुष्टात आले असते. आतापर्यंत फक्त गुजरात टायटन्स बाद फेरीत पोहचली असून चेन्नई सुपर किंग्ज आणि मुंबई इंडियन्स स्पर्धेबाहेर झाली आहे.

लखनौ सुपर जायंट्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्याकडे प्लेऑफमध्ये पोहचण्याची सहज संधी आहे. या दोन्ही संघांमध्ये अद्याप एक लढत व्हायची आहे. १५ मे रोजी होणाऱ्या या लढतीत लखनौचा विजय झाला, तर ते प्लेऑफमध्ये पोहचतील. राजस्थानला टॉप दोनमध्ये राहण्यासाठी शिल्लक दोन लढती जिंकाव्या लागतील. जर त्यांचा लखनौ आणि चेन्नईकडून पराभव झाला, तर प्लेऑफमध्ये पोहचण्यासाठी त्यांना रनरेटवर अवलंबून रहावे लागले. राजस्थानचा नेट रनरेट प्लस ०.२२८ इतका आहे.

बंगळुरूकडे आता फक्त एकच सामना शिल्लक आहे. १३ सामन्यांत त्यांचे १४ गुण झाले आहेत. बंगळुरूची अखेरची लढत अव्वल स्थानी असलेल्या गुजरातविरुद्ध होणार आहे. जर या सामन्यात त्यांचा पराभव झाला, तर संघाचे टेन्शन वाढू शकते, कारण त्यांचे नेटरनरेट वजा ०.३२३ इतके आहे आणि विजय मिळाला तर प्लेऑफमध्ये जाण्याची संधी अधिक असेल.

### दिल्ली, हैदराबाद, पंजाबसाठी संधी

पंजाबच्या विजयाने दिल्ली कॅपिटल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांचे टेन्शन वाढवले आहे. दिल्ली, पंजाब आणि हैदराबाद यापैकी दोन संघांचे १६ गुण होऊ शकतात. पंजाबला दोन सामने खेळायचे आहेत. या लढती दिल्ली आणि हैदराबादविरुद्ध होणार आहेत. जर दोन्हीत त्यांचा विजय झाला, तर दिल्ली आणि हैदराबादच्या अडचणी वाढतील. हैदराबादकडे अजून तीन लढती आहेत. पंजाब, कोलकाता आणि मुंबईविरुद्ध त्यांना खेळायचे आहे. मुंबईचा संघ स्पर्धेबाहेर झाला असला तरी तो लयीमध्ये आलाय. हैदराबादने पुढील तिनही सामन्यांत विजय मिळवला तर ते प्लेऑफसाठी दावेदारी दाखल करू शकतात.

# फ्लॉप ठरूनही विराट कोहलीने रचला नवा विक्रम

### आयपीएलमध्ये साडेसहा हजार धावा करणारा एकमेव खेळाडू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या पंधराव्या हंगामात विराट कोहलीने खराब खेळ केला. या हंगामात तो तीन वेळा एकही धाव न करताच तंबुत परतलेला आहे. असे असताना त्याचे क्रिकेट जगतातील स्थान अजूनही कायम आहे. त्याने पंजाबविरुद्ध खेळताना एक मोठा विक्रम केला आहे. आयपीएलमध्ये ६५०० धावांपर्यंत मजल मारणारा तो पहिला खेळाडू ठरलाय.

आयपीएलच्या पंधराव्या हंगामातील ६०व्या सामन्यात विराट कोहली खास खेळी करू शकला नाही. त्याने



१४ चेंडूंमध्ये २० धावा केल्या, परंतु या सामन्यात त्याने आयपीएलमध्ये ६५०० धावांचा टप्पा ओलांडला. विशेष म्हणजे आयपीएलमध्ये अशी कामगिरी करणारा तो पहिलाच फलंदाज ठरला. ही धावसंख्या गाठण्यासाठी त्याला फक्त एका धावेची गरज होती. हरप्रीत ब्रारने टाकलेल्या चेंडूवर फटका मारताच त्याने ६५०० धावांचा टप्पा ओलांडला.

विराटनंतर सहा हजारांपेक्षा जास्त धावा करणाऱ्यांमध्ये सध्या पंजाब किंग्जकडून खेळणारा शिखर धवन हा एकमेव खेळाडू आहे. त्यानंतर या रांगेत दिल्ली कॅपिटल्सकडून खेळणारा डेविड वॉर्नर तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्याने आयपीएलमध्ये ५,८७६ धावा केलेल्या आहेत, तर रोहित शर्मा चौथ्या क्रमांकावर असून त्याने ५,८२९ धावा केल्या आहेत. सध्या अनसोल्ड राहिलेला सुरेश रैना या शर्यतीत पाचव्या स्थानावर असून त्याच्या आयपीएलमध्ये ५,५२८ धावा आहेत.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com